# मविआची धोरणे शेतकरीविरोधी –राजू शेट्टी



**सांगली** : महाविकास आघाडीची धोरणे ही शेतकरीविरोधी आहेत, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर केली आहे. ते हुंकार यात्रेत बोलत होते. कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे येथे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हुंकार बळीराजा यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी राजू शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांना आठ तास व इतरांना २४ तास वीज असा दुजाभाव सरकार करीत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण जपले जात नाही. शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात नाही. रात्रीचा वीजपुरवठा केला जात आहे. वीजबिले मात्र अव्वाच्या सव्वा दिली जात आहेत. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

सोमवार, १८ एप्रिल २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २७०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

‘आगामी निवडणुकीत आरपीआय भाजपसोबत’/२
रायगडात पर्यटकांचा ओघ; व्यावसायिकांमध्ये उत्साह/७
पोलीस रोशन खडे ठरला ‘खोपोली श्री’चा मानकरी/८

# जय श्रीराम!

## राज ठाकरे ५ जूनला अयोध्येला जाणार
## महाराष्ट्र दिनी औरंगाबादेत जाहीर सभा

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे दौऱ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी हनुमान जयंतीनिमित्त सामूहिक हनुमान चालिसा पठण केल्यानंतर रविवारी (दि. १७) पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्यांनी ५ जूनला अयोध्येला जाण्याची घोषणा केली.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे म्हणाले की, माझ्या सभेत मी स्पष्ट केले होते की, हा सामाजिक विषय आहे. त्याच्याकडे त्याच अंगाने पाहणे आवश्यक आहे. या सगळ्या गोष्टींचा मुस्लिमांनाही त्रास होत आहे. अनेक वर्षे हा विषय असाच राहिला आहे. तुम्ही पाच वेळा भोंगे लावणार असाल, तर दिवसातून पाच वेळा आम्ही मशिदीसमोर हनुमान चालिसा लावू.

५ जून रोजी माझ्या सर्व सहकाऱ्यांसह मी अयोध्येला जाऊन दर्शन घेणार आहे. तत्पूर्वी महाराष्ट्र दिनी १ मे रोजी औरंगाबाद येथे जाहीर सभा घेणार आहे, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली

देशभरातील हिंदू बांधवांनो तयार राहा. ३ मेपर्यंत जर त्यांना समजले नाही, तर जशास तसे उत्तर देणे आवश्यक आहे. मनसे पक्ष म्हणून आमची सर्व बाजूंनी तयारी सुरू आहे. महाराष्ट्रात आणि देशात कोणत्याही प्रकारच्या दंगली नकोत. माणुसकीच्या नात्याने मुस्लिम धर्मियांनी या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रार्थनेला कोणीही विरोध केलेला नाही, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

आमच्याकडून मिरवणूक निघत असताना त्यावर दगडफेक होणार असेल, तर आम्ही शांत बसणार नाही. आमचे हात काही बांधलेले नाहीत. दगड आम्हालाही हातात घेता येतो. समोर जे कोणते हत्यार असेल ते आमच्याही हातात द्यायला लावू नका, अशी प्रतिक्रिया राज ठाकरे यांनी दिल्लीतील हिंसाचावरून दिली.

मला दोन घोषणा करायच्या असल्याने पत्रकार परिषद बोलवण्यात आली. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा अनेक गोष्टी मी बोलेन, असेही राज यांनी या वेळी स्पष्ट केले.



पनवेल : केळवणे जिल्हा परिषद गटाचे सदस्य ज्ञानेश्वर घरत, आपटा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्ता पाटील, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शेखर कानडे, माजी सरपंच राजू पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील, माजी उपसरपंच संजय पाटील, विलास ठाकूर, महादेव म्हात्रे, राजेश घरत, संजय कोळी, मिलिंद कोळी, महेंद्र भोईर, प्रदीप भोईर, गणेश शेलार, रोशन भोईर, ग्रामपंचायत सदस्य वंदना वाघे यांच्यासह शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून सर्वोत्कृष्ट पर्याय असलेल्या भारतीय जनता पक्षात शुक्रवारी जाहीर प्रवेश केला. त्यांनी रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांना मान्यवरांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नाराज सुरेश लाड काय निर्णय घेणार?

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड यांनी दुसऱ्यांदा राजीनाम्या दिल्यामुळे पक्षाचे वरिष्ठ नेते घायाळ झाले असून पदाधिकाऱ्यांमार्फत लाड यांची मनधरणी करण्याचे काम सुरू आहे, पण लाड हे आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने सध्या तरी रायगड जिल्हा राष्ट्रवादीत चिंतेचे वातावरण आहे.

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ असलेले आणि गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ माजी मंत्री व विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्याशी मैत्रीचे नाते असलेले सुरेश लाड यांनी दुसऱ्यांदा राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष ना. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी परिवार संवाद यात्रेचे नियोजन जिल्हाध्यक्ष सुरेश लाड यांनी केले होते, मात्र उरणच्या कार्यक्रमातून लाड तडकाफडकी निघून गेले.

कर्जतच्या शेळके हॉलमध्ये झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यातही लाड यांची गैरहजेरी खूप काही सांगून गेली. त्याच मेळाव्यात लाड यांनी जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा पीएमार्फत पाठवून दिल्याने खळबळ उडाली आहे.

मेळाव्यात ना. जयंत पाटील यांनी महामंडळांच्या अध्यक्षांच्या यादीत सुरेश लाड यांचे नाव अव्वल क्रमांकावर असल्याचे सांगून लाड समर्थकांना गोंजरण्याचा प्रयत्न केला, मात्र लाड आता दुसऱ्यांदा माघार घेण्यास तयार नाहीत. ते कुठल्या पक्षात जाणार हे आजही गुलदस्त्यात आहे, पण वरिष्ठ मनधरणी करण्यात अयशस्वी झाले, तर त्यांचे पक्षांतर अटळ आहे आणि त्याचा फटका पक्षाला बसेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे



### पुढील भूमिकेकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष

कर्जत–खालापूर मतदारसंघात आगामी २०२४मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सध्या असलेली तीन पक्षांची आघाडी कायम राहिली, तर विद्यमान आमदार शिवसेनेचे महेंद्र थोरवे हे उमेदवारीवर आपला हक्क सांगतील. मग लाड आमदारकी कसे लढणार? त्यामुळेच येत्या दोन दिवसांत प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन ते आपला निर्णय घोषित करण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या संदर्भात राष्ट्रवादीचे खालापूर तालुका अध्यक्ष नरेश पाटील यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी या वृत्ताचा इन्कार केला. ते म्हणाले, माझी याबाबत त्यांच्याशी चर्चा झाली आहे. सुरेश लाड हे राष्ट्रवादी सोडणार असल्याचे वृत्त चुकीचे असून असा कोणताही निर्णय त्यांनी घेतला नाही.

दुसरीकडे सुरेश लाड यांचे समर्थक मात्र अस्वस्थ आहेत. पक्षासाठी एवढे करूनही अन्याय होत असेल, तर दुसरा मार्ग चोखाळणे योग्य ठरेल, असे त्यांचे मत आहे. त्यामुळे लाड काय निर्णय घेणार याबाबत उत्सुकता आहे.

# टॉयलेट घोटाळ्याचा आरोप राजकीय हेतूने –सोमय्या

**मुंबई : प्रतिनिधी**

टॉयलेट घोटाळ्याचा आरोप राजकीय हेतूने केला जात आहे. त्याची आम्ही गंभीर दखल घेतो. या संबंधी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यापूर्वी या संपूर्ण गोष्टीचा पुन्हा एकदा विचार करावा. आवश्यकता असल्यास आमच्याशी संपर्क करावा, आम्हीही संबंधित माहिती द्यायला तयार आहोत, असे पत्र भाजप नेते किरीट सोमय्या यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी यांना दिले आहे.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सोमय्या कुटुंबीयांकडून चालविण्यात येणाऱ्या युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मिरा–भाईंदर महापालिका आणि अन्य ठिकाणी जवळपास १०० कोटींचा टॉयलेट घोटाळा करण्यात आला आहे, असा आरोप केला आहे. राऊतांचे हे आरोप किरीट सोमय्यांनी फेटाळले आहेत.

**(अधिक वृत्त पान २ वर..)**

# कोल्हापुरात भाजपच्या मतांमध्ये वाढ

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे विश्लेषण

**मुंबई : प्रतिनिधी**

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव झाला असला, तरी तीन पक्षांच्या महाआघाडीविरुद्ध आम्हाला मिळालेल्या मतांवर समाधानी आहोत. अतिशय मोठ्या प्रमाणात आमच्याकडे मतदार वळलेला आहे. आम्ही वारंवार जे सांगत होतो की ही जी पोकळी आहे ती आम्ही भरून काढत आहोत. ती कोल्हापुरातही भरून काढल्याचे दिसून आले, अशी प्रतिक्रिया विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते माध्यमांशी बोलत होते.



विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही आता एकटे लढलो तरी जेव्हा भाजप आणि शिवसेना एकत्र लढलो होतो त्यापेक्षा जास्त मते आहेत. ते तिघे लढले तरी त्यांची मते वाढलेली नाही. आताचे मत हे सहानुभूतीचे मत आहे. त्यामुळे २०२४मध्ये ही जागा आम्ही १०० टक्के जिंकणार याबद्दल माझ्या मनात खात्री आहे. **(पान २ वर..)**

### ‘संजय राऊतांना काही कामधंदा नाही’

महाराष्ट्रात दंगली घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे म्हणत शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी भाजपवर निशाणा साधला आहे, शिवाय अन्य मुद्द्यांवरूनही टीका केली आहे. यावर बोलताना विरोधी पक्षनेते फडणवीस यांनी, संजय राऊत हे निराश व्यक्ती आहेत. ते दिवसभरात काहीही बोलत असतात. कितीवेळा आम्ही उत्तरे द्यायची. आम्हाला कामधंदे आहेत. त्यांना नाहीत, असा टोला लगावला.

# महाडमध्ये अल्पवयीन मुलीवर बलात्कार; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

एका अल्पवयीन मुलाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याने यातून ही मुलगी गरोदर राहिल्याची धक्कादायक घटना महाड तालुक्यातील कोथुर्डे आदिवासीवाडीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी अल्पवयीन मुलावर महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पीडित मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार कोथुर्डे आदिवासीवाडीतील १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलाने आपल्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीशी मागील दोन वर्षांपासून बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले होते. यातून ही अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली आहे.

पोलिसांकडून अल्पवयीन मुलावर बलात्कार तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण या अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुलगा हा अल्पवयीन असल्याने त्याला बाल न्यायालयात हजर केले जाणार आहे.

# दिल्ली हिंसाचारप्रकरणी १४ जणांना अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीच्या जहाँगीरपुरी भागात शनिवारी हनुमान जन्मोत्सवाच्या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आल्यानंतर झालेल्या हिंसाचारात नऊ जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी कारवाई करीत आतापर्यंत १४ जणांना अटक केली आहे.

हनुमान जयंतीची पारंपरिक मिरवणूक कुशल चित्रपटगृहाजवळ पोहचल्यानंतर दोन समुदायांमध्ये संघर्ष झाला. हा हिंसाचार थांबवण्याचा प्रयत्न करणारे आठ पोलीस कर्मचारी आणि एक नागरिक असे नऊ जण दगडफेकीत जखमी झाले आहेत.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीचे पोलीस आयुक्त राकेश अस्थाना आणि विशेष पोलीस आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) दिपेंद्र पाठक यांच्याशी चर्चा केली असून संवेदशनीलपणे प्रकरण हाताळताना योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

### कर्नाटकातही हिंसाचार; ४० जणांना अटक

**धारवाड** : कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातील जुन्या हुबळी पोलीस ठाण्यावर शनिवारी रात्री जमावाने केलेल्या दगडफेकीच्या घटनेनंतर ४० जणांना अटक करण्यात आली आहे. या हल्ल्यात एका पोलीस निरीक्षकासह १२ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत.



**नवी मुंबई : आयपीएलमध्ये रविवारी झालेल्या साखळी सामन्यात सनरायझर्स हैदराबादने पंजाब किंग्जवर सात गडी राखून विजय मिळवला. पंजाबने दिलेले १५१ धावांचे लक्ष्य हैदराबादने एक षटक आणि एक चेंडू राखून गाठले. हैदराबादकडून उमरान मलिकने नेत्रदीपक कामगिरी करीत चार विकेट्स घेतल्या, तर त्याने टाकलेल्या चेंडूवरच पंजाबचा एक गडी धावबाद झाला.**



# टॉयलेट घोटाळ्याचा आरोप राजकीय हेतूने

## किरीट सोमय्या यांचा संजय राऊतांवर पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

टॉयलेट घोटाळ्याचे आरोप राजकीय हेतूने केला जात आहे. त्याची आम्ही गंभीर दखल घेतो. यासंबंधी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यापूर्वी या संपूर्ण गोष्टीचा पुन्हा एकदा विचार करावा, आवश्यकता असल्यास आमच्याशी संपर्क करावा, आम्हीही संबंधित माहिती द्यायला तयार आहोत, असे पत्र भाजप नेते किरीट सोमय्या यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी यांना दिले आहे.



शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी किरीट सोमय्या यांच्यावर पुन्हा एकदा भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. किरीट सोमय्या यांच्या कुटुंबीयांकडून चालविण्यात येणाऱ्या युवाप्रतिष्ठानच्या माध्यमातून मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि अन्य ठिकाणी जवळपास १०० कोटींचा 'टॉयलेट घोटाळा' करण्यात आला आहे, असा आरोप शिवसेना नेते संजय राऊत यांनी केला. संजय राऊतांचे हे आरोप किरीट सोमय्यांनी फेटाळले आहेत, मात्र कोणतीही कारवाई करण्याआधी आमच्याशी संपर्क करा, असं पत्रात नमूद केले आहे.

राजकीय किंवा अन्य दडपणाखाली सोमय्या परिवाराच्या विरोधात गुन्हा नोंदवायचा अशा प्रकारची कृती अधिकारी वर्ग करणार नाही, असा विश्वास व्यक्त करतो, असेही सोमय्यांनी पत्रात नमूद केले आहे.







**मुंबई : बीकेसी येथे हुनर हाट या राष्ट्रीय हस्तकला व खाद्य महोत्सवाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाला माजी मंत्री प्रकाश जावडेकर, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी, आमदार आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, केंद्रीय वक्फ बोर्डचे वसीम खान, भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर उपस्थित होते. केंद्रीय अल्पसंख्याकमंत्री मुख्तार अब्बास नखवी यांच्या मंत्रालयामार्फत अनेक वर्षे हा उपक्रम राबविला जात आहे. त्यास मुंबईसह संपूर्ण देशातून प्रतिसाद मिळतो.**

# बंदी उठल्याने नेरूळच्या जत्रेत उत्साहाचे वातावरण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे सर्व जग ठप्प झाले होते. यामुळे विकासाची गती प्रचंड मंदावली होती. या महामारीचा सर्वाधिक फटका गावागावात भरणाऱ्या जत्रांनाही बसला होता, परंतु या वर्षी जत्रांवरील बंदी उठविल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नेरूळ गावातील रांजणदेवी, करंजदेवीच्या जत्रेत भाविकांनी मोठी गर्दी केली होती.





दरवर्षी चैत्रकृष्ण प्रतिपदा व द्वितीया या दिवशी नेरूळ गावातील नवसाला पावणाऱ्या, हाकेला धावणाऱ्या गावदेवी आईची जत्रा भरते. पालखीची मिरवणूक, तरवे काढणे, तुळा करणे, मानाच्या काठ्या काढणे या बरोबरच शोभेच्या दारुची आतषबाजी, भंडाऱ्याची उधळण, देवीला नवस बोलणाऱ्यांची, नवस फेडणाऱ्यांची भाऊगर्दी नजरेत भरत होता.

जत्रेत खेळणी, बांगड्या, कपडे, मिठाईची, कपड्यांची, नारळ, हार-फुलांची दुकाने, विविध प्रकारचे पाळणे, जादूचे प्रयोग यांची रेलचेल व व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदही ओसंडून वाहताना दिसत होता.

कार्ला येथील एकविरा देवीची चैत्र शुद्ध सप्तमीची जत्रा झाली की, गावोगावच्या जत्रांना सुरुवात होते. नवी मुंबईत जुहू, करावे, दारावे व बेलापूर गावच्या जत्रेने या जत्रांना सुरुवात होते. यानंतर नेरूळ, सानपाडा, सारसोळे, तुर्भे, कुकशेत, वाशी, दिवाळे, कोपरखैरणे, तळवली, ऐरोली अशा गावोगावच्या जत्रा सुरू होतात.



**नवी मुंबई : आमदार मंदा म्हात्रे यांनी दिवाळे गाव येथील मारुती मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त दर्शन घेतले. या वेळी फगवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष अनंता बोस, खांदेवाले मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष रमेश हिंडे, भाग्यवान कोळी, परशुराम पाटील, अशोक गझने, ज्ञानेश्वर कोळी, भारती पाटील आणि भाविक उपस्थित होते.**

# महाविकास आघाडीची सर्वच धोरणे शेतकरीविरोधी -राजू शेट्टी

**सांगली : प्रतिनिधी**

कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे येथे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हुंकार बळीराजा यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. तसेच देवराष्ट्रे येथे शाखा उद्घाटन करण्यात आले. महाविकास आघाडीची धोरणी ही शेतकऱ्यांविरोधी आहेत, अशी सरकारवर टिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केली. ते हुंकार यात्रेत बोलत होते.

जिल्हाध्यक्ष महेश खराडे, रामदास महिंद, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप राजोबा, राज्यविज अभ्यासक श्रीदास होनमाने उपस्थित होते.

राजू शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांना ८ तास व इतरांना २४ तास वीज असा दुजाभाव सरकार करीत आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण जपले जात नाही. शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात नाही. रात्रीचा वीजपुरवठा केला जात आहे. वीजबिले अव्वाच्या सव्वा दिली जात आहेत. दिवसा वीज मिळण्यासाठी व शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी ग्रामसभेत ठराव घ्या, आजच्या घडीला सरकार सहा टक्के शेतमाल खरेदी करीत आहे. इतर माल बाजारात विक्री केला जात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला कोर्टात खेचून तोंडावर पाडणार आहे आणि येणारा हंगाम शेतकऱ्यांना एकरकमी एफआरपी दिली नाही, तर कारखाने सुरु करू देणार नाही, असेही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी म्हणाले.

# न्हावेखाडी येथे श्री म्हसेश्वर देवाची यात्रा

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील न्हावेखाडी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने १९ व २० एप्रिल दरम्यान श्री म्हसेश्वर देवाच्या यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सर्वच सण, उत्सव, यात्रांवर बंदी घालण्यात आली होती, मात्र आता शासनाने सर्व निर्बंध शिथिल केल्यानंतर न्हावेखाडी येथे श्री म्हसेश्वर देवाच्या यात्रोत्सवाचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सवानिमित्त मंगळवारी (दि. १९) स्टेप आर्ट डान्स अ‍ॅकॅडमी प्रस्तुत पप्पु सूर्यराव निर्मित जल्लोष सुवर्णयुगाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून कार्यक्रमाचे खास आकर्षण आई तुझं डोंगर फेम गायक अमोल जाधव हे असणार आहेत. हा कार्यक्रम न्हावेवाडी-उत्तरपाडा येथील म्हसेश्वर मंदिरात होणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या यात्रोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उष्णतेच्या वाढत्या त्रासामुळे पनवेल उपजिल्हा रुग्णालयात गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत कोविड रुग्णालयाचा दर्जा प्राप्त असलेले उपजिल्हा रुग्णालय नॉनकोविड म्हणून नजीकच्या तीन महिन्यांपासून कार्यरत आहे. पनवेलमध्ये कोविडची तिसरी लाट पूर्णपणे ओसरली आहे. क्वचितच कोविडचा एखादा दुसरा रुग्ण आढळत आहे. वाढत्या उष्णतेमुळे मात्र इतर आजारांच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे.




यामध्ये बहुतांश त्वचा रोगाच्या रुग्णांची संख्या मोठी आहे. दररोज जनरल ओपीडीत सुमारे १०० ते १५० रुग्ण भेट देत असतात. एकीकडे पारा ४० डिग्रीच्या वर पोहोचला आहे. मागील दोन महिन्यांपासून वाढत्या तापमानाने सर्वांचीच तारांबळ उडाली असून लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांमध्ये तापसरी, अपचन, पित्त, अन्नावरील वासना जाणे अशा प्रकारचे आजार बळावत आहेत. त्यामुळे ओपीडीमध्ये रुग्णांची संख्या गेल्या महिन्यापासून वाढली असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन संकपाळ यांनी दिली.

कोरोनानंतर डोकेदुखी, सर्दी, अंगदुखी, ताप, त्वचारोग यांसारख्या रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

जानेवारीत त्वचा, तर फेब्रुवारी, मार्च प्रसुतीच्या संख्येत वाढ झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने आहार घ्यावा आणि आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**

**सोमवार, दि. १८ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रूग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/ दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन ॲपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन ॲपवर वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.


# आगामी विधानसभा निवडणुकीत आरपीआय भाजपसोबत लढणार

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची घोषणा

**बेळगाव : वृत्तसंस्था**

आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) व भाजप युती संदर्भात लवकरच मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची भेट घेण्यात येणार असल्याचे केंद्रीय समाज कल्याण रामदास आठवले यांनी सांगितले. आरपीआयच्या राज्य कार्यकारिणीची रविवारी (ता.१७) सभा झाली, त्या वेळी ते बोलत होते. सुरुवातीला आठवले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. नंतर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मंत्री आठवले म्हणाले,देशात काँग्रेस पक्षाची ७० वर्षे सत्ता होती. तरीही देशाचा विकास अपेक्षित घडला नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वप्न साकार झाले नाही. जाती व्यवस्था आणि अस्पृषता कायम आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निवडणुकीमध्ये पराभव केला. दलित, अल्पसंख्याकांना व्होट बँक म्हणून पाहिले. मात्र, देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी धुरा सांभाळलीनंतर भ्रष्टाचारावर अंकुश राहिला. विकासाला गती मिळाल्यामुळे आरपीआय पक्ष भाजपसोबत असेल.

मंत्री आठवले म्हणाले, पक्ष संघटनेला बळकटी द्या. पक्षाची ताकद वाढावी, यासाठी कार्यकर्त्यांची मोर्चेबांधणी केली जावी. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपली जबाबदारी ओळखून पक्षासाठी कार्यरत असावे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी निवड संदर्भात निर्णय घेताना आरपीआय पक्षाला विश्वासात घ्यावे, यासंदर्भात चर्चा कर्नाटकाचे मुख्यमंत्री बोम्मई यांच्याशी आगामी कालावधीत करणार आहे. या वेळी आरपीआयचे राज्य उपाध्यक्ष डॉ. एम. वेंकटस्वामी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर मल्लेश चौगुले, श्रवण कांबळे, लकाप्पा तळवार, शंकर अजमनी, बसवराज डाके, महादेव तळवार, शिवा चौगुले, दिलशाद ताशिलदार, अजीत हरिजन, दिवानसाब देसाई, हसिना शेख आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## कोल्हापुरात भाजपच्या मतांमध्ये वाढ -देवेंद्र फडणवीस

मनसे प्रमुख राज ठाकरे हे अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. याशिवाय पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांचादेखील अयोध्या दौरा लवकरच असणार आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना फडणवीस म्हणाले की, अयोध्येचा दौरा हा कोणीही करायला हरकत नाही, कारण प्रभू श्रीराम हे आपले दैवत आहे आणि त्यांचे दर्शन घेण्यासाठी जर कोणी जाणार असेल, तर त्याचे स्वागतच आहे. आम्हीदेखील त्या ठिकाणी जात असतो आणि मला असे वाटते की, कुठल्याही व्यक्तीला तिथे जावसे वाटणे यामध्ये काही गैर नाही. प्रभू श्रीरामांचे इतके मोठे मंदिर हे त्या ठिकाणी होतेय. त्याची भव्यता पाहण्याची इच्छा आणि प्रभू श्रीरामाची दर्शन घेण्याची इच्छा ही स्वाभाविक आहे.

# लोटे एमआयडीसीतील कंपनीला भीषण आग

**खेड :** तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीमधील प्रिवी ऑरगॅनिक कंपनीचे गोडाऊनला रविवारी (दि. १७) पहाटे साडेतीनच्या सुमारास आग लागली. या आगीत कंपनीचे गोडावून भक्ष्यस्थानी पडले.

रविवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. कंपनीसाठी लागणारा कच्च्या मालासह विविध प्रकारचे सॉलव्हटची गोडाऊनमध्ये साठवणूक करण्यात आली आहे. हे साँलव्हंट अत्यंत ज्वालाग्राही असल्याने आगीने क्षणात रौद्र रुप धारण केले. एमआयडीसीचे दोन अग्निशामक बंब आणि चिपळून, खेड नगरपालिकेचे अग्निशामक बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आग लागली तेव्हा गोडाउनमध्ये कोणी नव्हते, त्यामुळे जीवितहानी टळली, मात्र मंगेश पवार नामक एका कामगाराला आगीतून पसरलेल्या वायुची बाधा झाली आहे.





# उलवे नोडमधील नागरी समस्या सोडवणार

## माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे बैठकीत आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर ९ येथील सोसायटीतील रहिवाशांना काही नागरी समस्या भेडसावत आहेत. या पार्श्वभूमीवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रहिवाशांसोबत शनिवारी (दि. १६) बैठक झाली. या वेळी रामशेठ ठाकूर यांनी नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन रहिवाशांना दिले.

या बैठकीस गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, सुजाता पाटील, सुधीर ठाकूर, सुहास भगत, तिवारी यांच्यासह सोसायटीच्या चेअरमन सिना वर्गिस, सदस्य अर्चना मिश्रा आणि अन्य सदस्य, रहिवासी उपस्थित होते.

या बैठकीत सोयसायटीतील नागरिकांनी वाहतूक व अन्य समस्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासमोर मांडल्या. त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिले. त्याचप्रमाणे सोसायटीच्या लगत असलेल्या मोकळ्या भूखंडावर मंदिर उभारण्याचा रहिवाशांचा मानस आहे. त्यासाठीही सहकार्य करू, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आश्वासित केले.

दरम्यान, या वेळी सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक दौलत मिराणी यांना वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

# पनवेलमध्ये हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

## कळंबोलीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले बजरंगबलीचे दर्शन

**पनवेल : वार्ताहर**

कोविड काळात गेली दोन वर्षे हनुमान जयंती उत्सव जल्लोषात साजरा झाला नव्हता, यावेळी कोविडचे बंधन नसल्याने मोठ्या जल्लोषात व उत्साहात हनुमान जन्मोत्सव लाईन आळी, श्री हनुमान मंदिरात साजरा झाला. कळंबोली शहरातील मंदिरातहील विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन कक्षरण्यात आले होते.




कळंबोली येथे पहाटे पाच वाजता भाजप व व्यापारी संघटनेचे अध्यक्ष कमल कोठारी यांच्या हस्ते बजरंग बळींचा महाअभिषेक करण्यात आला. दुपारी १२ ते ३ सुंदर कांड वाचन, भजन, सायंकाळी ४ वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. हनुमानाच्या मिरवणूक सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, माजी स्थायी समिती सभापती व नगरसेवक अमर पाटील, नगरसेवक बबन मुकादम, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविशेठ पाटील, बबन बारगजे, महिला भाजप नेत्या प्रिया मुकादम, संतोष मोकल यांच्यासह मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद वाटपाचे कार्यक्रम घेण्यात आले. शहरांसह गावातील हनुमान मंदिरांना विद्युत रोषणाई केली होती. हनुमान जयंतीनिमित्त सकाळी श्री देव हनुमंताची



विधिवत पूजा-अर्चा व जन्माचा पाळणा म्हणून उत्सवाची सुरुवात झाली. तसेच संध्याकाळी मंगल वाद्य वाजवून सातारकर बंधूनी आपली सेवा केली. त्यानंतर महाआरती व रात्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, पनवेलतर्फे सुश्राव्य भजन करण्यात आले. या वेळी सप्रेबुवा, बबन बुवा मढवी, अस्वले, रानडे बंधू, सुधाकर पाटील सारडेकर, गावंड बुवा आदी भजनी बुवांच्या वतीने भजन सेवा करण्यात आली.

या वेळी हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष अनिल कुरघोडे, उपाध्यक्ष रवींद्र पडवळ, सेक्रेटरी राजेंद्र घुले, खजिनदार शेखर गायखे, पुरुषोत्तम पटवेकर, चद्रकांत घुले, अनिल टेमघरे, सुनील कुरघोडे, अभिजित चव्हाण, कुणाल कुरघोडे, राजेंद्र आमले, प्रमोद कुरघोडे, बबन मढवी, गुजराती, अशोक पडवळ,आदी देवस्थानचे विश्वस्थ व सेवेकरी उपस्थित होते.




**कामोठे : येथील हनुमान मंदिरात शनिवारी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी नगरसेवक विजय चिपळेकर, विकास घरत, भाजप शहराध्यक्ष रवी जोशी, न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन स्वामी म्हात्रे, पुरातन गणेश मंदिर उपाध्यक्ष युवराज पाटील, सामाजिक कार्यकर्ते मयूर चिपळेकर, भाजप कार्यकर्ते गोपीनाथ गोवारी, ग्रामस्थ किशोर गोवारी, संतोष पाटील आदींनी त्यांचे स्वागत केले.**






**पनवेल : हनुमान जयंतीनिमित्त पनवेल आणि आसूडगाव येथील कार्यक्रमांना महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. शहरातील लक्ष्मी वसाहतीमध्ये वंदे मातरम् चालक-मालक संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमावेळी संतोष ढगे, राजेश टाकर, विजय शिंदे, नितेश मंजुळे, सनी भोईर, आसूडगाव येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिरामध्ये आयोजित कार्यक्रमावेळी दीपक गायकवाड, गोपीनाथ मुंडे, युवा मोर्चा खांदा कॉलनी शहर अध्यक्ष अभिषेक भोपी, उदयप्रताप सिंग, रवींद्र चितळे, डॉ. विनय पाटील, नंदकुमार जोशी तर लोखंडी पाडा येथे आयोजित कार्यक्रमावेळी लक्ष्मण पांचाळ, अभय शिंदे, चैतन्य कांबळे, रोशन घरत, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**





**पनवेल : कोरोना महामारी सरल्यानंतर गावजत्रा उत्साहात होत आहेत. न्हावा येथेही श्रद्धा व भक्तीमय वातावरणात जत्रा झाली. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, गाव अध्यक्ष शैलेश पाटील, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, भाजप अध्यक्ष तुषार भोईर, गावकीचे उपाध्यक्ष मोरेश्वर पाटील, खजिनदार सुरेश म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.**

# राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. युक्रेन आणि रशियाकडून गहू आयात करणाऱ्या कोणत्या देशाने आता भारताकडून गहू आयातीचा निर्णय घेतला आहे?**

*अ.* जर्मनी — *आ.* ब्रिटन
*इ.* इजिप्त — *ई.* क्युबा

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी काढावे लागणारे डीमॅट खाते कोणत्या संस्था देतात?**

*अ.* सेबी आणि रिझर्व बँक — *आ.* सेबी आणि एनएसडीएल
*इ.* सेबी आणि सीडीएसएल — *ई.* एनएसडीएल आणि सीडीएसएल

**३. आठ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडे परकीय चलनाचा साठा किती होता?**

*अ.* ६०४ अब्ज डॉलर — *आ.* ६४२ अब्ज डॉलर
*इ.* ६०० अब्ज डॉलर — *ई.* ६२५ अब्ज डॉलर






**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# उरण येथे हनुमान जयंती उत्साहात; धार्मिक कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

श्री हनुमान जयंती सोहळा उरण शहरासह ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात शनिवारी (दि. १६) साजरा करण्यात आला. शहरातील मोरा, गणपती चौक, भोवरा, हनुमान कोळीवाडा, चिरनेर, करंजा, नवीन शेवा आदी ठिकाणी भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.




शहरातील गणपती चौक येथील श्री हनुमान मंदिरातील मूर्ती सन १६३८ सालातील सुमारे ३७२ वर्षांपूर्वीची आहे. येथील श्री हनुमान जयंती उत्सव मंडळ उरण यांच्या वतीने श्री हनुमान जयंतीनिमित्त मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ४ वाजता महापूजा, ५ वाजता कीर्तनकार हभप सुधीर महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. सकाळी ८ ते दुपारी २ पर्यंत श्री. गजानन प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत कै. सुनिता महादेव ढोले व कै. मीना रूपचंदानी यांच्या सौजन्याने भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत श्री गुरुदत्त प्रासादिक भजन वावंजे (कुंभारवाडा) रायगड भूषण श्री विष्णू बुवा वावंजेकर यांचे भजन, रात्री ९ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात आली.

## संपादकीय

# स्वदेशीचा आग्रह

नवभारताचे शिल्पकार म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी एका कार्यक्रमात बोलताना स्वदेशी वस्तूंचा वापर करा, असे आवाहन देशवासीयांना करीत आत्मनिर्भर होण्याचा मोलाचा सल्ला दिला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जागतिक आर्थिक परिस्थिती हेलकावे खात असताना आपल्या देशात उपलब्ध असलेल्या साधनसाम्रगीचा वापर नागरिकांनी करून उत्कर्ष साधावा हे पंतप्रधान मोदींना यातून अभिप्रेत आहे, जे स्वागतार्हच आहे.

**नरेंद्र दामोदरदास मोदी... भारतवर्षाला लाभलेले सक्षम, मेहनती, दूरदृष्टीचे, यशस्वी आणि लोकप्रिय नेतृत्व. त्यांनी आपल्या देशाचा कायापालट केला असून जागतिक पातळीवर देशाला नवी उंची आणि ओळख मिळवून दिली आहे. तसे पाहिले तर ऐतिहासिक-धार्मिक पार्श्वभूमी, परंपरा आणि वैशिष्ट्यांनी नटलेला आपला देश म्हणजे एक चमत्कार आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. एवढ्या जाती-धर्मांचे लोक इथे गुण्यागोविंदाने राहतात. या विविधतेतील एकतेचे संपूर्ण विश्वाला नेहमीच कुतूहल आणि आश्चर्य वाटत आले आहे, मात्र इतके सारे असूनही दुर्दैवाने कुचकामी आणि निष्क्रिय राज्यकर्त्यांमुळे आपला देश मागे राहिला. यापूर्वी आपल्या देशातील पंतप्रधान, राष्ट्रपती यांसारख्या बड्या नेत्यांना परदेशांमध्ये प्रतिष्ठा नव्हती किंबहुना आपल्याला नेहमीच दुय्यम वागणूक मिळत आलेली आहे. भारतीय नागरिकांना तर परदेशी लोकांकडून अपमानास्पद वागणूक मिळत असे, परंतु नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच चित्र बदलले. जे देश आपल्याला याआधी आपल्याकडे दुर्लक्ष करीत, आपल्याला दूषणे देत तेच देश आणि त्यांचे प्रमुख आज आपल्या स्वागतासाठी पायघड्या घालून सज्ज असतात. हा सन्मान मिळवून देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. एवढेच नव्हे तर त्यांनी विविध देशांचे दौरे करून त्यांच्याशी संबंध वाढविले, ज्यामुळे उद्योग-व्यवहारात उत्तम प्रकारे आदानप्रदान होत असल्याचे चित्र आहे. एकीकडे हे सुरू असतानाच दुसरीकडे आपल्या देशात उपलब्ध असलेल्या संसाधनाचा योग्य वापर व्हावा यासाठी पंतप्रधान मोदींचा आग्रह आहे आणि तो रास्तच आहे. जागतिक पातळीवरील बदलत्या घडामोडींचा प्रत्येक देशावर परिणाम होत असतो. अलिकडे सुरू असलेल्या रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष झळ अनेक देशांना बसली आहे. अशा संकटांवेळी आपली घडी विस्कटू नये याकरिता आपण आत्मनिर्भर राहणे आवश्यक आहे. काही उत्पादने आपल्याकडे तयार होत नाहीत. ती आयात करावी लागतात, पण अनेक वस्तू आपण स्वत: तयार करू शकतो. पूर्वी आपल्याकडे खेडेगावांत बारा बलुतेदार पद्धत अस्तित्वात होती. ज्या ज्या गोष्टींची गरज गावकऱ्यांना भासायची त्या जवळपास सर्व गोष्टी गावातच तयार होत असत. म्हणजेच त्याचे उत्पादन स्थानिक पातळीवर होत असे आणि त्यामुळे भांडवलही तेथील लोकांच्याच पदरी पडे. हीच आत्मनिर्भर भारताची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संकल्पना आहे. जनतेने स्वत: कष्ट करून आत्मनिर्भर व्हावे त्याचप्रमाणे आपल्या देशातीलच उत्पादने खरेदी करावीत, असे त्यांचे सातत्याने सांगणे आहे. त्यासाठी व्होकल फॉर लोकल हा संदेशही त्यांनी दिला आहे. स्वदेशीची कास धरून संत तुकाराम महाराजांच्या 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे वाटचाल केल्यास नक्कीच यश मिळेल.**

# नेरळमध्ये उभारला जातोय घनकचरा प्रकल्प!



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. मध्य रेल्वेने जोडलेल्या नेरळ या ग्रामपंचायतमधील कचऱ्याचा प्रश्न गेले काही वर्षे सतत चर्चेला जात होता. हा प्रश्न रायगड जिल्हा परिषदेच्या नेरळ ममदापुर संकुल विकास प्राधिकरणकडून तब्बल तीन कोटींचा निधी मंजूर झाला असून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी दिला आहे. नेरळ ग्रामपंचायतीसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आकाराला येत असून राज्यातील ग्रामपंचायत मध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करून उभारला जाणारा प्रकल्प पहिला प्रकल्प ठरणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प शहरीकरण झालेल्या नेरळ ग्रामपंचायत मध्ये यशस्वी झाल्यास नेरळ गाव हे शून्य कचरा डेपो असलेले गाव बनेल आणि कचरा मुक्त गाव होण्यास त्या प्रकल्पाची साथ मिळणार आहे. दुसरीकडे नेरळ ग्रामपंचायतीच्या निमित्ताने मोठ्या ग्रामपंचायती यांना देखील असे प्रकल्प उभे करण्याची हिंमत तेथील पदाधिकारी आणि प्रशासन यांच्यात निर्माण होऊ शकते.

नेरळ आणि ममदापूर या दोन गावांची ग्रामपंचायत असल्यापासून कर्जत-कल्याण रस्त्यावर धरणाच्या खाली कचरा डेपो होता. २५ वर्षांपूर्वी नेरळ ग्रामपंचायतमधून ममदापूर गावाची स्वतंत्र ग्रामपंचायत बनली. मात्र नेरळ गावाचा कचरा डेपो काही हलवला गेला नाही आणि २०२१पर्यंत कचरा डेपो पूर्वीच्या जागेवरच होता, मात्र सतत जाळला जाणारा कचरा आणि त्यातून निघणारा धूर यामुळे नेरळकरांचे आरोग्य धोक्यात आले होते. सतत जाळल्या जाणाऱ्या कचऱ्याबद्दल सतत प्रसारमाध्यमे यांच्याकडून आवाज उठविला गेला आणि २०२१च्या पावसाळ्यात रायगड जिल्हा परिषदेने नेरळच्या जळत्या कचरा डेपोबद्दल गांभीर्याने घेतले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ किरण पाटील यांनी नेरळ विकास प्राधिकरण मधील नेरळचे सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर आणि सदस्य यांच्यासोबत अलिबाग येथे बैठक घेतली. त्या बैठकीत नेरळ ग्रामपंचायतीसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प साकारण्यासाठी निर्धार जाहीर करण्यात आला. नेरळ विकास प्राधिकरण कडून नेरळ ग्रामपंचायतमधील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी देण्याचे जाहीर केले.

यानुसार रायगड जिल्हा परिषदेने नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तीन कोटी रुपये खर्चाचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे काम नेरळ विकास प्राधिकरण मधून पूर्व भागातील कचरा डेपो येथे सुरू करण्यात आले आहे. नेरळच्या पूर्व भागात नेरळ ग्रामपंचायतीची पाच एकर जमीन असून त्या जमिनीवर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प साकारला जात आहे. या प्रकल्पामध्ये नेरळ गावाच्या कचऱ्यावर तत्काळ प्रक्रिया होणार असून कचरा डेपोत दररोज येणारा कचरा यावर त्याच दिवशी विघटन करून प्रक्रिया केली जाणार आहे. त्यामुळे हा कचरा डेपो भविष्यात शून्य कचरा डेपो करण्याचा निर्धार जिल्हा परिषद प्रशासन आणि नेरळ ग्रामपंचायतीने केला आहे. त्यानुसार आगामी काळात या प्रकल्प साकारत असताना नेरळ ग्रामपंचायत मधील ग्रामस्थांनी घरातून दिला जाणारा कचरा याचे वर्गीकरण करून तो घंटागाडीमध्ये टाकावा लागणार आहे. ओला आणि सुका तसेच काचेच्या वस्तू यांचा कचरा यांचे वर्गीकरण करून कचरा दिला गेल्यावरच कचरा डेपोमध्ये त्या



कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे विघटन करता येणार आहे. त्यामुळे नेरळच्या ग्रामस्थांना आधी कचऱ्याचे वर्गीकरण कसे करायचे हे शिकून घ्यावे लागणार आहे.

नेरळ गावातील कचऱ्याचा प्रश्न नागरीकरणकडे झुकलेल्या गावातील लोकांच्या हातात आहे. हा प्रश्न सोडविण्याचे आणि नेरळ गावाला कचरा मुक्त गाव करण्याचे स्वप्न साकार करण्याचे आवाहन या निमित्ताने नेरळच्या सरपंच पारधी यांनी केले आहे. तर नेरळ ग्रामपंचायतीचा घनकचरा प्रकल्प यशस्वी करण्याचे देखील नेरळकरांच्या हाती असल्याने नेरळ ग्रामपंचायतीचा कचरा डेपो कधी शून्य कचरा डेपो होणार? याकडे लक्ष लागून राहणार आहे. मात्र राज्यातील निवडक ग्रामपंचायत वगळता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अन्य कुठेही नाही आणि त्यामुळे तीन कोटींचा खर्च होत असलेल्या नेरळ घनकचरा प्रकल्पाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.



**कचऱ्याचे वर्गीकरण**

आता तब्बल १६ प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण केले जात आहे. प्रत्येक दिवशी ओला, सुका, डायपर, सॅनिटरी, नपकीन यांचे एकत्रित संकलन दररोज करण्यास सुरुवात झाली आहे. त्याशिवाय आठवड्यात काही दिवस नागरिकांनी कोणता स्वरूपाचा कचरा कोणत्या दिवशी कचरा कुंडीत टाकला पाहिजे आणि तो घंटागाडीत पडला पाहिजे याचे नियोजन आरोग्य आणि स्वच्छता विभागाने केले आहे. मात्र कचऱ्याचे वर्गीकरण करताना एखाद्या नागरिकाने मिश्र स्थितीत कचरा घंटागाडीत टाकला तर त्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई ग्रामपंचायत प्रशासनाने करण्यास सुरुवात केली आहे. त्यात महत्त्वाची बाब म्हणजे प्लास्टिक पिशवीमध्ये भरून ठेवलेला कचरा न स्वीकारण्याचे धोरण नेरळ ग्रामपंचायतीला स्वीकारले लागेल. त्यातून प्लास्टिक बंदीकडे शहराची वाटचाल सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

**...अन्यथा कारवाई अटळ!**

कचऱ्याची विल्हेवाट करताना कचरा वर्गीकरण केलेल्या स्वरूपात कचरा डेपोमध्ये पोहोचल्यास विघटन होणे सोपे जाईल आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या नियमावली नुसार शहरांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी महत्वाचे त्याचे योगदान मोठे ठरेल. त्याचवेळी ग्रामपंचायत कडून कचऱ्याशी संबंधित असलेल्या बाबीबद्दल देखील ठोस भूमिका घेतली आहे. त्यात मृत जनावरे, पाळीव प्राणी यांची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी त्या प्राण्यांच्या मालकांची राहील असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच बांधकाम करताना निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे खड्ड्यात विघटन करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. शहरात या नियमांचे पालन करताना कोणी दिसले नाही, तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी प्रशासन कोणाचाही विचार करू शकतो.




## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅप यूजर्सना नवीन फिचर्स





लवकरच व्हॉट्सअ‍ॅप आपल्या यूजर्सना नवीन फिचर्स देणार आहे. या फिचर्समुळे युजर्स आता ग्रुप व्हॉईस कॉलवर अधिक लोकांना जोडू शकतील आणि मोठ्या फाईल्स दुसर्या व्हॉट्सअ‍ॅप युजर्संना सहजतेने पाठवू शकतील. व्हॉट्सअ‍ॅपने गुरुवारी जाहीर केले की, ३२ लोकांना ग्रुप व्हॉईस कॉलमध्ये सहभागी होण्याची आणि दोन जीबीपर्यंतच्या फाइल्स शेअर करण्याची परवानगी देईल. याशिवाय व्हॉट्सअ‍ॅपने आणखी अनेक नवीन फिचर्स देण्याची घोषणा केली आहे. सध्या मोबाईल अ‍ॅप वापरून ग्रुप व्हॉईस कॉलमध्ये फक्त आठ लोकांना जोडता येते. तसेच युजर्स एक जीबीपेक्षा जास्त फाइल इतर कोणत्याही युजर्सला शेअर करू शकत नव्हते.



व्हॉट्सअ‍ॅप चॅट ग्रुपच्या अ‍ॅडमिनला कधीही मेसेज डिलीट करण्याची परवानगी देईल. कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले की, डिलीट केलेले चॅट ग्रुपमधील कोणत्याही सदस्याला दिसणार नाही. मेटा प्लॅटफॉर्मचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, आम्ही व्हॉट्सअ‍ॅपवरील ग्रुप्समध्ये फीडबॅक, मोठ्या फाइल शेअरिंग आणि मोठ्या ग्रुप कॉलसह नवीन वैशिष्ट्ये देत आहोत. मात्र, व्हॉट्सअ‍ॅपमध्ये हे नवीन फिचर्स कधी जोडले जातील याबाबत कंपनीकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. व्हॉट्सअ‍ॅपचे जगभरात २ अब्जाहून अधिक सक्रिय युजर्स आहेत. एका अहवालानुसार, व्हॉट्सअ‍ॅपचे जगात सर्वाधिक युजर्स भारतात आहेत. ज्यांची संख्या सुमारे ४८.७ कोटी आहे.

# स्मरण.. महर्षी धोंडो केशव कर्वेंचे



महिलांना शिक्षण मिळावे, त्यांच्या हक्काची त्यांना जाणीव व्हावी, विधवांना पुर्नविवाह करता यावा यासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या वयाची १०४ वर्ष अविरत संघर्ष केला. महर्षी कर्वे यांना धोंडो केशव आणि अण्णासाहेब या टोपण नावाने देखील ओळखले जायचे.

त्यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात १८ एप्रील १८५८ ला रत्नागिरी जिल्हयात खेड तालुक्यामधे शेरावली या गावी झाला. त्यांचे बालपण मुरूड या रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावात गेले.

शिक्षणाकरता त्यांना फार परिश्रम घ्यावे लागले, दुरवर पायपीट करावी लागायची १८८१ ला ते मॅट्रिक झाल्यानंतर मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताची पदवी घेण्याकरता त्यांनी प्रवेश मिळविला. कर्वे १४ वर्षांचे असतांना त्यांचा विवाह ८ वर्षांच्या राधाबाईंशी झाला.

राधाबाईंचा वयाच्या २७ व्या वर्षी १८९१ ला बाळंतपणात मृत्यू झाला. कर्वेंनी त्या वर्षी फर्ग्युसन कॉलेज येथे गणित हा विषय शिकविण्यास सुरूवात केली. १९१४ पर्यंत त्यांचे हे कार्य सुरू होते. राधाबाईंच्या निधनानंतर कर्वेंना पुर्नविवाह करण्यासंबंधी घरून फार आग्रह झाला. त्यावेळी त्यांचे वय ४५ च्या आसपास होते. प्रौढ विधुराचा विवाह देखील त्याकाळी लहान वयाच्या कुमारीकेशी लावुन देण्याची प्रथा होती परंतु जर मुलीच्या पतीचे लवकर निधन झाले तर तिला मात्र तीचं आयुष्य विधवा म्हणुन व्यतीत करावे लागे. महर्षी कर्वेंना ही बाब अजिबात मान्य नव्हती आणि म्हणून त्यांनी पंडीता रमाबाईंच्या शारदा सदन येथे वास्तव्यास असलेल्या गोदुबाई या विधवेशी पुनर्विवाह केला.

समाजाला ही गोष्ट अजिबात रूचली नाही आणि म्हणुनच ज्यावेळी ते पत्नीसह मुरूड येथे गेले तेव्हा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला होता. पण एवढ्याने खचतील ते कर्वे कसले त्यांनी या गोष्टींचा देखील धिटाईने सामना केला. गोदुबाई पुढे आनंदी कर्वे व बाया कर्वे या नावाने प्रसिध्द झाल्या. महर्षी कर्वेंच्या कार्यांत त्यांनी यथोचित साथ दिली आणि बरोबरीने उभ्या राहिल्या. महर्षी धोंडो केशव कर्वेंनी ज्यावेळी हा पुर्नविवाह केला ती व्यक्तीगत बाब नसुन त्यावेळी समाजाल्या जुन्या विचारांशी केलेले ते एक बंडच होते. समाजात विधवा पुर्नविवाहाची बाब वाढीस लागावी म्हणुन केलेली ती एक जागरूकताच होती.


२१ मे १८९४ रोजी कर्वेंनी पुर्नविवाह केलेल्यांचा एक मेळावा भरविला आणि या वेळी त्यांनी 'विधवा विवाह प्रतिबंध निवारक' मंडळाची स्थापना देखील केली. विधवांना पुन्हा विवाह करण्यास विरोध करणाऱ्या लोकांवर अंकुश लावण्याची जवाबदारी या मंडळाची होती. रूढी परंपरांमधे गुरफटलेल्या स्त्रियांना मोकळा श्वास घेता यावा केशवपन, बालविवाह सारख्या परंपरा बंद व्हाव्यात म्हणून अनाथ बालिकाश्रमाची त्यांनी १८९६ ला स्थापना केली.

१९०० साली अण्णांनी अनाथ बालिकाश्रमाचे स्थानांतर पुण्यातील हिंगणा (आताचे कर्वेनगर) येथे केले. येथे विधवांकरता वसतीगृहाची त्यांनी निर्मीती केली, त्यामुळे विधवा महिलांना हक्काचे छत मिळाले. (विकिपीडियातून साभार)



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : येथील किनारी वाळूत गाडी फसली आणि ती वाळूतून बाहेर काढताना पर्यटकांची दमछाक झाली. अखेर जेसीबी आणून पर्यटकांना आपली गाडी बाहेर काढावी लागली.** (छाया : सुधीर नाझरे)



## आरोग्य प्रहर



# पाठदुखीचा त्रास आणि उपाय

धावपळीची या जीवनात माणसाचे स्वत:कडे दुर्लक्ष होत आहे. दिवसभराच्या धावपळीत माणसाला ना आराम करायला वेळ आहे ना व्यायामाला. अशा दिनचर्येत माणसाला अनेक आजारांना सामोरे जावे लागते. त्यात पाठदुखीचा त्रास अनेकांना भेडसावतो. पाठीच्या दुखण्यावर दुर्लक्ष केल्याने दुखणं वाढते. यावर योग्य ते उपचार करणे आवश्यक आहे.

**पाठदुखीची कारणे**

आपली रोजची जीवनशैली पाठदुखीसाठी कारणीभूत आहे, कारण अनेकांना कामानिमित्त ऑफिसमध्ये दिवसरात्र संगणकासमोर बसून काम करावे लागते, बस किंवा ट्रेननं प्रवास करताना तासन्तास उभं राहून प्रवास होतो. हा प्रवास करताना पाठीवर असलेल्या बॅगेमुळे पाठीच्या कण्यावर ताण येतो. बऱ्याचदा आपण चुकीचे झोपतो, ताठ बसत नाही, बरीचशी कामे बसूनच करतो. परिणामी, बदललेल्या जीवनशैलीमुळे आपण स्वतःच आपल्या या पाठीच्या दुखण्याला आमंत्रण देतो.

**सोपे घरगुती उपाय**

१. बर्फामुळे वेदना शमतात. बर्फ रुमालात गुंडाळून पाठीवर ज्या ठिकाणी वेदना होतात तिथे ५-१० मिनिटं फिरवावा. यामुळे पाठीच्या वेदना कमी होतात. २. बसण्या उठण्याच्या, चालण्याच्या, उभे राहाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे शरीराची ठेवण सदोष होते. वाकून, खांदे झुकवून चालणं, वाकडं उभं राहणं, पाठीला वाक देऊन बसणे यामुळे पाठीचं दुखणं उद्‌भवते. तज्ज्ञ म्हणतात बसताना ताठ बसावं, पाठीला आराम हवा असल्यास पाठ टेकून पण ताठ बसावे. झोपतानाही पाठीवर झोपण्याचा प्रयत्न करावा. ३. लसणाचे तेल लावल्यास पाठीच्या दुखण्यावर आराम मिळतो. लसणाचे तेल करण्यासाठी भांड्यात मोहरीचे किंवा तिळाचं तेल घ्यावं, मंद आचेवर तेल गरम करावे. तेल गरम झाले की, त्यात ८ ते १० लसणाच्या कळ्या घालाव्यात. लसूण सोनेरी रंगावर तळला गेला की, गॅस बंद करावा. तेल गाळून घ्यावं. या तेलानं मसाज करावा.

# माथेरानमध्ये करातून जेमतेम उत्पन्न

## पालिकेच्या १३ कर्मचाऱ्यांवर संकलनाची जबाबदारी




**कर्जत : बातमीदार**

माथेरान या पर्यटनस्थळावर येणारे पर्यटक यांच्याकडून माथेरान गिरीस्थान नगर परिषदेकडून स्वच्छता कर घेतला जातो. पर्यटकांकडून घेतला जाणारा कर संकलन ठेका रद्द झाल्याने १ एप्रिल २०२२पासून माथेरान गिरिस्थान नगर परिषदेच्या माध्यमातून कर संकलन करीत आहे, मात्र या करातून उत्पन्न पालिकेला जेमतेम मिळत असल्याचे पुढे येत आहे.

दरम्यान, पालिकेचे कायमस्वरूपी सात आणि सहा कंत्राटी कामगार असे १३ कामगार यांच्या माध्यमातून पालिका कर संकलन करीत आहे, मात्र एप्रिल हा कडक उन्हाचा महिना असल्याने थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माथेरान महिन्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. गेल्या १६ दिवसांत जेमतेम उत्पन्न पर्यटकांच्या स्वच्छता कराच्या माध्यमातून पालिकेकडे जमा झाले आहेत. माथेरान पालिकेने दिलेले ठेकेदाराने कर संकलन ठेका स्वतः रद्द केल्याने माथेरान पालिकेवर पर्यटकांच्या प्रवेशाचे करसंकलन करण्याची वेळ आली आहे. ३१ मार्च २०२२ रोजी कर संकलनाचा ठेका रद्द झाल्यानंतर माथेरान पालिकेने आपले कर्मचारी वर्गावर प्रवासी कर संकलन करण्याची जबाबदारी दिली होती. ३१मार्चच्या मध्यरात्री नंतर माथेरान पालिकेने सात कायमस्वरूपी कर्मचारी आणि सहा कंत्राटी कामगार यांच्या माध्यमातून कर संकलन सुरु केले आहे. कर संकलनाचा ठेकेदार पालिकेला पूर्वी ३२ लाख दर महिना देणार होता, तर कोविडनंतर ठेकेदाराला सवलती देण्यात आल्याने महिन्याला २८ लाख रुपये पालिकेला द्यावे लागत होते. माथेरानमध्ये पर्यटनासाठी पर्यटक आले नाहीत, मात्र प्रवासी कराचा ठेका मिळविणाऱ्या ठेकेदाराला महिन्याला ती रक्कम द्यावी लागत होती, परंतु कोविडनंतर पर्यटक यांची संख्या रोडावण्याच्या शक्यतेने ठेकेदाराला असल्याने ठेकेदार कंपनीने ठेका सोडून दिला होता.

पालिकेचे नुकसान होऊ नये म्हणून माथेरान गिरीस्थान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी १ एप्रिलपासून प्रवासी कर संकलन करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी पालिकेचे एक लेखापाल यांच्यासह सहा चतुर्थ श्रेणी कर्मचारी या सात कामगारांच्या मदतीला सहा कंत्राटी कामगार यांची नेमणूक केली आहे. या सर्व कायमस्वरूपी कर्मचारी यांना पालिकेने वेगळ्या कामावर नेमले असले तरी त्यांना पालिकेकडूनच वेतन दिले जाते, तर सहा कंत्राटी कामगारांना पालिका वेतन म्हणून मानधन देत आहे.

पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून पालिकेला किती उत्पन्न होत असते. बाहेर सर्वत्र कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना सर्वत्र थंड हवेचे ठिकाणे फुल्ल झाली आहेत. अशावेळी माथेरानच्या पर्यटन हंगामात एप्रिल आणि मे महिना महत्वाचा समजला जातो, मात्र पालिकेने माथेरानमध्ये येणारी पर्यटक प्रवासी यांच्याकडून केलेले कर संकलन हे सव्वा नऊ लाख इतके आहे. मागील १६ दिवसात साधारण १८६७० प्रौढ आणि १४०० लहान मुले असे पर्यटक आल्याची नोंद आहे. त्यातून पालिकेला सव्वा नऊ लाख रुपये १६ दिवसात गोळा झालेले असताना या महिन्यातील उर्वरित १५ दिवसात हा आकडा २० लाख उत्पन्नाचा आकडा गाठण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे ठेकेदारावर जबाबदारी असताना पालिकेच्या तिजोरीत गोळा होणारी रक्कम आणि पालिका प्रशासन कर संकलन करीत असताना गोळा होणारी रक्कम कमी भरू शकते.

यामुळे ऐन पर्यटन हंगामात माथेरान पालिकेचे नुकसान प्रवासी कर संकलन करण्यासाठी नवीन ठेकेदार नेमला नसल्याने होण्याची शक्यता आहे. कर संकलन कामगार पालिकेचे नुकसान होऊ नये यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेने तत्काळ प्रवासी कर संकलन करण्यासाठी ठेकेदार निश्चित करावा यासाठी निविदा काढण्याची सूचना मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना करण्यात आली आहे. मात्र प्रवासी कर संकलन करण्यासाठी नवीन ठेकेदार नेमण्याबाबत पालिकेकडून कार्यवाही करण्याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही, परंतु तब्बल १३ कर्मचारी या कामात गुंतले असल्याने माथेरान पालिकेने नवीन ठेकेदार निश्चित करण्याची गरज बोलून दाखवली जात आहे.

**पालिकेने जे चतुर्थ श्रेणी कामगार कर संकलनासाठी लावले आहेत, ते पालिकेत यापूर्वी अन्य काम करायचे. त्यामुळे त्या कामगारांवर अतिरिक्त कामाचा बोजा किंवा त्या कामगारांवर अतिरिक्त खर्च देखील होत नाही, मात्र भविष्यात संगणकीय प्रणालीचा वापर करून कर संकलन करता येईल काय? यावर अभ्यास सुरू आहे. त्यातून पारदर्शक आणि गळती याबाबत प्रामुख्याने लक्ष दिले जात आहे. ठेकेदार न नेमता पालिका संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून गोळा करू शकते. यावर यंत्रणा काम करीत आहे. त्यासाठी तीन ठिकाणी कर संकलन केंद्र बनविण्याचा पालिकेचा मानस असून त्या त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे यांचे जाळे उभारण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे आगामी काळात पालिका पारदर्शक कामावर भर देईल. कर संकलनाचा ठेकेदार निश्चित करण्यासाठी २०१६ आणि २०१९मध्ये निश्चित केलेली रक्कम पालिकेला मिळेल काय? याबाबत शंका निर्माण होत आहे. त्यामुळे नवीन ठेका काढण्यासाठी पालिका घाई करणार नाही.**

**–सुरेखा भणगे,**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**

# जिल्ह्यातील मासळी विक्रेत्या महिलांना मिळाली आर्थिक मदत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला विविध वादळांचा वेळोवेळी बसला. या वादळात बोटींसह मच्छीमारांचे प्रचंड नुकसान झाले. ऐन हंगामात मासेमारी करता आली नाही. गेले दोन वर्ष कोरोनामुळेही मच्छीमार हवालदिल झाले होते. त्यामुळे मच्छीमार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहा हजार महिला मासळी विक्रेत्यांना सुमारे चार कोटी रुपयांचा आर्थिक आधार मिळाला आहे.

रायगड जिल्ह्यात तीन हजारांहून अधिक मच्छीमार बोटी असून या व्यवसायावर सुमारे दोन लाखांपेक्षा अधिक जण अवलंबून आहेत. मासेमारी करणे, ती बंदरात उतरविणे, सुकवणे, मासळीची वाहतूक, विक्री अशा अनेक प्रकारची कामे केली जातात. मासेमारी व्यवसायातून कोट्यवधींची उलाढाल होते. या व्यवसायातून कोळी समाज बांधवांचा उदरनिर्वाह चालतो.

एक जून ते ३१ जुलैपर्यंत मासेमारीला बंदी असते. ती १ ऑगस्टपासून पुन्हा सुरू होते. परंतु २०१९ मध्ये ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्याला फयाण व महावादळाचा फटका बसला. किनाऱ्यावर नांगरून ठेवलेल्या बोटी एकमेकांवर आदळल्याने मच्छीमारांचे मोठे नुकसान झाले. मासेमारीचे जाळे तुटले. या कालावधीत सुमारे २० कोटींपेक्षा अधिक नुकसान सहन करावे लागल्याने मच्छीमार मोठ्या आर्थिक संकटात सापडले होते. त्यामुळे ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या हंगामात मासेमारी करणे कठीण झाल्याने मच्छीमार मेटाकुटीला आले होते.

अखेर दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नुकसानग्रस्तांना मदत मिळाली आहे. मासळी ठेवण्यासाठी बर्फ बॉक्स घेणे व इतर मूलभूत सुविधांसाठी ही मदत करण्यात आली होती. एकूण चार कोटी रुपयांची मदत मत्स्य विभागाकडून देण्यात आली.

**२०१९ मध्ये ऑगस्ट–ऑक्टोबरमध्ये आलेल्या वादळातील नुकसानग्रस्तांना मदत म्हणून मत्स्य विभागाकडून मासळी विक्रेत्या महिलांना चार कोटी रुपयांची मदत केली आहे. तसेच बोट मालकांनाही मदत केली आहे. उर्वरित नुकसानग्रस्तांना मदत देण्यासाठी शासनाकडे मागणी केली आहे.**

**–सुरेश भारती, साहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, रायगड**



**खोपोली : सलग सुट्ट्या आल्यामुळे मोठ्या प्रमाणात मुंबईकरांची पावले खोपोलीकडे वळली. परिसरातील पर्यटनस्थळे तसेच खंडाळा, लोणावळा या परिसराला मुंबईकर नेहमीच भेट देत असतात. रविवारी सायंकाळी परतणाऱ्या पर्यटकांनी खोपोली रेल्वेस्थानकात अशी मोठी गर्दी केली होती.** (छाया : विनायक माडपे)



**खोपोली : उत्कृष्ट व्याख्याते, सामाजिक कार्यकर्ते म्हणून कोकण मराठी साहित्य परिषदेच्या खोपोलीत झालेल्या गुणगौरव समारंभात रा.स्व.संघाचे तालुका कार्यवाह अविनाश मोरे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या वेळी विविध मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.**

# रेवदंड्यात हनुमान जयंती उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेली दोन वर्ष कोरोना संसर्ग रोगाच्या कालावधीत कोरोनामुळे साधा पध्दतीने श्री हनुमान जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावर्षी मात्र लॉकडाऊन पुर्णतः शिथील करण्यात आल्याने, रेवदंड्यातील पारनाका येथील मारूती मंदिरात हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

यावर्षी पारनाका येथील मारूती मंदिरात हनुमान जयंती निमित्त आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. श्री हनुमान जयंती निमित्त मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावर्षी पहाटे ५.३० ते ७.३० पर्यंत अनंत बाळकृष्ण केळकर यांचे श्रींच्या जन्माचे कीर्तन, सकाळी दहा ते बारा पर्यंत श्रींच्या मूर्तीवर लघूरूद्र अभिषेक, दुपारी तीन ते चार मिरा भजन मंडळ रेवदंडा यांचे भजन, सायकांळी साडेसहा ते साडेसात पर्यंत महाआरती, रात्री आठ ते दहा पर्यंत मारूती मंदिर देवस्थान पंचकमिटी व ग्रामस्थ रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने श्रींच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच श्री मारूती देवस्थान कमिटी व रेवदंडा ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने सायकांळी चार ते सहा वाजेपर्यंत पनवेलचे विश्वेस अनंत नातू यांचे प्रवचन, व रात्री नऊ वाजता पुणे येथील राजस्थानी भजनी मंडळ यांची भजनसंध्या असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# तूपगावच्या खलाटीमध्ये उन्हाळी वालाची लागवड

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

चौकपासून जवळच असलेल्या तूपगावच्या खलाटीमध्ये उन्हाळी हंगामात वालाची लागवड केली जाते. या खलाटीतील वाल चांगल्या चविचा ओळखला जातो.

वाल येथील भागात खूप प्रसिद्ध आहे. यावर्षी पावसाने आपल्या लहरी प्रमाणे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान केले त्यांना या वेळेस मोसमामध्ये कोणत्याही प्रकारचे पीक घेता आले नाही. अशावेळी चौकचे प्रयोगशील शेतकरी यशवंत सपकाळ यांनी आपल्या जमिनीत उपलब्ध पाण्याच्यासोयीनुसार सध्या बाजारामध्ये नवीनच दाखल झालेले कर्जत तीन या लहान भाताचे बियाणं आपल्या शेतामध्ये करण्याचे ठरविले होते. त्यांच्या या प्रयत्नाला निसर्गाने चांगली साथ दिली असून कर्जत तीन हे पीक चांगल्या प्रकारे आले आहे या परिसरातील सर्व शेतकरी बंधू त्यांच्या या प्रयोगशील शेतीकडे आवर्जून भेट देत आहेत. त्यांनी केलेल्या भाताचे कौतुक सर्वत्र होत आहे. तसेच त्यांच्या उर्वरित शेतीत पॉलिहाऊस बनवून त्यामध्ये सेंद्रिय खतावर पालेभाजी,पपई, केळीचे पीक, सुद्धा घेतली आहे . त्यांच्या या पिकामुळे त्यांच्या घरातील भाजीपाला दोन्ही वेळेस सुटत आहे. यातून त्यांना आर्थिक मोबदला मिळाला आहे. दरम्यान तूपगावमध्ये उन्हाळी शेती होत असते.

# कर्जत कोलिवलीतील विठ्ठल मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील कोलिवली गावातील विठ्ठल रखुमाई मंदिराचा सहावा वर्धापन दिन सोहळा धार्मिक कार्यक्रमाच्या आयोजनात साजरा झाला.

ह.भ.प.श्री शरद महाराज कराळे यांच्या प्रांगणा तश्री विठ्ठल रखुमाई मंदिराच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त मंदिरात अभिषेक तर दुपारी श्री सटूआई प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन सादर झाले. गावातील तरुण गायिका चंदना डांगरे यांनी आपल्या सहकारी यांच्यासह यांच्या भजनाचा कार्यक्रम सादर झाला. तर तसेच सायंकाळी ह.भ.प.कैलास महाराज भोईर यांचे प्रवचन झाले त्यान्चानिम्मित्ताने त्यांचा गौरव शरद महाराज कारले यांनी केला.रात्री विश्वधर्म वारकरी शिक्षण संस्था वारदोली प्रबळगड येथील ह।भ.प. रामायनाचार्य संजय महाराज पाटील यांचं सुश्राव्य हरी कीर्तन झाले.कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन कोलीवली शाळेचे मुख्याध्यापक श्री एन डी म्हात्रे यांनी केले.



# चैत्र गौरी उत्सव

मराठी कालगणनेनुसार नवीन संवत्सराचा पहिला दिवस गुढीपाढवा. संपूर्ण भारतात हिंदू धार्मियांच्या घरोघरी गुढी उभारून नव वर्षाचे स्वागत करून पूजा करून गोड धोड नैवेद्य दाखवून आनंद व्यक्त करतात. एकमेकांना नव वर्षाच्या शुभेच्छा देतात. शोभा यात्राद्वारे गुढी पाडवा आनंदात साजरा करतात. चैत्र महिन्यांत देव देवता, संत महंत व महान व प्रसिध्द व्यक्तींच्या जयंती पुण्यतिथींचे कार्यक्रम होतात. म्हणून चैत्र महिना पवित्र मानतात. गुढी पाडव्यानंतर एक दिवस सरला की येते चैत्र शु.तृतीया.

चैत्र शु.तृतीया हा दिवस खूप महत्वाचा आहे. या दिवसापासून पुढे वैशाख शु.तृतीया म्हणजे अक्षय तृतीया हे दिवस चैत्र गौरी पूजन समजले जातात. हिंदू धर्म, संस्कृती प्रमाणे व अन्य उपासना पध्दती मधील उत्सव, सण व व्रतवैकल्ये यांना वैज्ञानिक व धार्मिक शास्त्राधार असतो म्हणून असे सण उत्सव साजरे करतांना औपचारिकता ठेऊ नये. मनामध्ये विकल्प नसावा. शुध्द मनाने, श्रध्दापूर्वक व मनोभावे साजरे करावेत. त्यायोगे चैतन्य निर्मिती होऊन कल्याणमय जीवनाचा व ईश्वर प्राप्तीचा मार्ग सुलभ होतो. असा एक सण म्हणजे चैत्र गौरी उत्सव महाराष्ट्रात विशेषतः कोकणांत चैत्र गौरी पूजन हा सण पारंपारिक पध्दतीने साजरा केला जातो. वसंत ऋतूचे आगमन झालेले असते. त्यामुळे कोकणात या सणाला आंबेखाणी असेही संबोधतात.

चैत्र गौरी पूजन कधी पासून सुरू झाले, यासंबंधी एक आख्यायिका



सांगितली जाते. आपणांस माहित आहे की, ती देवतामधील प्रमुख म्हणजे श्रीमहादेव (श्रीशंकर) यांचा विवाह हिमालयाची कन्या गौरी हिजबरोबर झाला. लग्नानंतर गौरी श्रीशंकरा सोबत सासरी म्हणजे कैलासावर गेली. विवाह संस्काराप्रमाणे वधू काही कालानंतर माहेरी येते त्याप्रमाणे गौरी माहेरपणाला आली तो दिवस पवित्र महिन्यातील चैत्र शु.तृतीया होता आणि महिनाभर पाहुणचार घेऊन आई वडिल मित्र मैत्रिणी बरोबर सुख शांतीच्या गोष्टी करून गौरी न्यावयास आलेल्या पतीबरोबर सासरी जाते तो दिवस वैशाख शु.तृतीया म्हणजे अक्षय तृतीया होता. म्हणून तेव्हापासून चैत्र गौरी पूजनाचा सोहळा महिनाभर चालू असतो.

कालपरत्वे उत्सवाचे स्वरूप बदलत गेले असले तरी गौरी पूजनातील तत्वे म्हणजे, माया ममता जिव्हाळा, स्नेहलता व स्निग्धता या पाच गोष्टी त्याच आहेत. पूजनाचे प्रतिक तेच आहे. दिवाळीमध्ये ज्या प्रमाणे भाऊबीजेला बहिण भावाचे घरी म्हणजेच माहेरवासाला येते, उददेश एकच एकमेकांचे क्षेत्र कुशल समजावे. खरोखरच आपली मुलगी सुखी आहे हे मुली कडूनच समजावे. तो उद्देश चैत्र गौरी पूजनानंतर साध्य होतो.

वरील अख्यायिका प्रमाणे चैत्र गौरी पूजनाचा उत्सव वैयक्तिक किंवा सार्वजनिकरित्या साजरा केला जातो. महिलाच हा उत्सव साजरा करीत असल्याने या पुजेला अगर उत्सवाला सवाष्ण पूजन असेही म्हणतात. पूजनासाठी अन्नपूर्णेची मुर्ती मांडतात ती नसेल तर कागदावरील प्रतिमाही पूजनासाठी घेतात. सौभाग्य दानाने षोडशोपचारे पूजन करून सुवासिक असलेल्या मोगऱ्याची फुले व माला अर्पण करतात. हेतू इतकाच सुवासिक फुलांच्या दरवळाने वातावरण सुगंधीत होते. मने प्रसन्न होतात. चैत्र गौरी समोर निरनिराळया फळांची तबके, तयार केलेल्या पदार्थांची ताटे मांडली जातात. फुलांची आरास करतात. पूजनानंतर सुवासिनींना हळदी कुंकूवा बरोबरच वेणी अगर गजरा, भिजलेल्या कच्च्या चण्याची डाळ व खणाने ओटी भरली जाते. चैत्र गौरीच्या येण्याचा दिवस म्हणजे स्त्रियांच्या भाव विभोर, उत्साही श्रध्देचे, धार्मिक वृत्तीचे दर्शन घडविते. गौरीच्या नैवेद्याला आंबेडाळ व कच्च्या कैरीचे पन्हे सुवासिनींना दिले जाते. संपूर्ण महिना आनंदाचा असतो.

गौरी पूजनाचा सामुदाईक कार्यक्रमही महिन्याभरात करतात. महिला मंडळे, वसाहतीमधील महिला, काही संस्था सर्वांना सोईस्कर होईल असा दिवस शोधून त्या दिवशी गौरी पूजन सांग्र संगीत व मोठया भक्तिभावाने करतात. शोभिवंत फुलांची आरास केली जाते. फळे खाद्यपदार्था बरोबरच बत्तासेही असतात. पूजनानंतर गौरीची गाणी, फेराची गाणी, पारंपारिक नृत्ये सादर करतात. काही ठिकाणी तीर्थ प्रसादाबरोबर भोजनही असते. मुख्य म्हणजे आंबेडाळ व पन्हे असतेच. चैत्र गौरी पूजनाचे व्रत वा उत्सव माहेर वाशिणींसाठी, सौख्याचा, सौभाग्याचा व आनंदाचा समजला जातो. तो भारतीय संस्कृतीचा ठेवा आहे. त्याची जपणूक व्हावी हीच गौरीच्या चरणी प्रार्थना.

**–अ. का. सिंगासने, पनवेल**

# पनवेलमध्ये कर्करोगावर अद्ययावत उपचार

## मुंबई ऑन्कोकेअर सेंटरचे अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

कर्करोगावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अद्ययावत उपचार करणाऱ्या मुंबई ऑन्कोकेअर सेंटरच्या पनवेलमधील खांदा वसाहत येथील शाखेचे उद्घाटन रविवारी (दि. १७) रोजी सेंटरचे अभिनेत्री, निर्माती डॉ. निशिगंधा वाड तसेच टाटा मेमोरियल हॉस्पिटल नवी मुंबईचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या हस्ते व पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.






या उद्घाटन कार्यक्रमाला डॉ. गिरीश गुणे, डॉ. देवेंद्र पाल आणि डॉ. प्रितम कळसकर, डॉ. अक्षय शिवचंद, डॉ. चंद्रशेखर पेठे, डॉ. सोनल दांडे, डॉ. मंगेश मेखा, डॉ. रितू दवे, डॉ. स्मित शेठ, डॉ. उदीप माहेश्वरी, डॉ. सीमा जागियासी, डॉ. दर्शना राणे, डॉ. आशिष जोशी, डॉ. क्षितीज जोशी, डॉ. वाषिशेठ मणियार, डॉ. प्रदीप किंद्रे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुंबई ऑन्कोकेअर सेंटर ही कर्करोगांवर अद्ययावत उपचार करणारी डे-केअर साखळीस्वरुप संस्था आहे. मुंबई व महाराष्ट्रात ८ सेंटर्स सध्या कार्यरत असून गेली ४ वर्ष कर्करोगग्रस्तांना उच्चशिक्षित कर्करोग तज्ज्ञांमार्फत, सर्व आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा डे केअर सेंटर्समध्ये, वाजवी दरात उपचार उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# नोडनुसार बदलणार सिडकोच्या घरांचे दर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोने जानेवारी व मार्चमध्ये दोन विक्री योजनांचा शुभारंभ करून एप्रिलमध्ये या घरांची सोडत काढली आहे. नुकतीच तळोजा येथील ५,७३० आणि गेली अनेक वर्षे शिल्लक असलेली ७३८ अशा ६.५०८ घरांची सोडत काढली असून लाभार्थ्यांना देखभाल खर्चासह घरांची सर्व रक्कम भरल्यानंतर ताबा देण्याची प्रक्रिया यंदा पूर्ण केली जाणार आहे. याच वेळी शिल्लक असलेल्या सुमारे दीड हजार घरांची सोडत पुढील महिन्यात काढणार आहे, मात्र यासाठी सिडको नोडनुसार घरांचे दर आकारण्याची शक्यता आहे.

सिडकोने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर तळोजा येथे पाच हजारांपेक्षा जास्त घरांची गृहयोजना पूर्ण केली असून या घरांची अर्ज विक्री २६ जानेवारी रोजी सुरू करण्यात आली. त्यानंतर मागील काही वर्षांत व्हॅलीशिल्प, अनिवासी संकुल आणि इतर गृहयोजनेतील काही घरे आरक्षणाअभावी विक्रीविना शिल्लक होती. ही शिल्लक घरेदेखील सिडकोने गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर विक्रीस काढली आहेत.

यात पंतप्रधान आवास योजनेचा जास्त समावेश आहे. सिडकोने काढलेल्या शिल्लक घरांच्या विक्रीमुळे या उत्पन्न गटातील नागरिकांना घरे उपलब्ध झालेली आहेत, मात्र या घरांच्या किंमती काहीशा जास्त असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.

# पंतप्रधान आवास योजनेंतर्गत देशात अडीच कोटी घरे पूर्ण

■ भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांची माहिती

**नवी मुंबई : बातमीदार**

गोरगरिबांचे मालकीच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आतापर्यंत ३.१० कोटी पक्की घरे देशभर बांधण्यात आली आहेत. या योजनेसाठी ३ लाख कोटींहून अधिक अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी दिली.

भारतीय जनता पक्षाच्या ४२ व्या स्थापनादिनानिमित्त मोदी सरकारच्या लोकोपयोगी योजनांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाराष्ट्रात या योजनेअंतर्गत ६ लाख ६८ हजार ३६३ बांधून देण्यात आली आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.



ते म्हणाले की, देशातील प्रत्येक गोरगरीब माणसाच्या मालकीचे घर असावे या हेतूने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान आवास योजना सुरू केली.

या योजनेची अंमलबजावणी शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात होत आहे. ग्रामीण भागात २.५२ कोटी घरे बांधून देण्यात आली आहेत तर शहरी आवास योजनेअंतर्गत ५८ लाख पक्की घरे बांधण्यात आली आहेत.

ग्रामीण आवास योजनेअंतर्गत १.९५ लाख कोटी इतके अर्थसहाय्य गरजूंना देण्यात आले आहे. शहरी आवास योजनेअंतर्गत १.१८ लाख कोटी इतके अर्थसहाय्य लाभार्थींना देण्यात आले आहे. गरीब माणसाला हक्काचे घर असले की, त्याच्या जीवनाला स्थैर्य मिळून तो आपल्या उत्पन्न वाढीसाठी अधिक जोमाने नवे प्रयत्न करू शकतो, हे ओळखून या योजनेची सुरुवात करण्यात आली.

या योजनेखाली बांधून देण्यात येणाऱ्या घरात उज्वला योजनेअंतर्गत गॅस कनेक्शन मोफत दिले जाते, तसेच शौचालय, पाणीपुरवठा, वीज कनेक्शन या सुविधाही दिल्या जातात, अशी माहितीही त्यांनी या वेळी दिली.

# कळंबाली वसाहतीतील रस्ता डांबरीकरणाला मुहूर्त सापडला

**कळंबोली : राम्रपहर वृत्त**

कळंबोलीतील एलआयजी भागात पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात मिळावे यासाठी कळंबोली सिडको प्रशासनाने गतवर्षीच्या मे महिन्यात मोठ्या जलवाहिनीचे काम केले, मात्र त्यासाठी खोदून ठेवलेला भला मोठा रस्ता पूर्ववत करण्यासाठी तब्बल एक वर्षाने सिडको प्रशासनाला मुहूर्त सापडला. हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.



कळंबोली वसाहतीमधील सिडको सेंट जोसेफ विद्यालयाच्या बाजूला असणाऱ्या पाण्याच्या टाकीपासून ते नजीकच्या एक. आयजी भागात जलवाहिनी टाकण्याचे काम गतवर्षीच्या मे महिन्यामध्ये सडको प्रशासनाकडून करण्यात आले. यासाठी येथील सर्वच रस्ता खोदून त्यातून जलवाहिनी टाकली. जलवाहिनीचे काम पूर्ण झाले तरीही गेल्या वर्षभरामध्ये खोदलेला रस्ता पूर्ववत डांबरीकरण आणि चकाचक करण्याचे मुहूर्त काही सिडकोला सापडेना. यामुळे नागरिकांची गैरसोय करून ठेवली. नागरिकांकडून याबाबत संताप व्यक्त केला जात होता.

या रस्त्यावर सेंट जोसेफ विद्यालयातील येणाऱ्या विद्यार्थी पालक व नागरिकांची वर्दळ फार मोठ्या प्रमाणावर असते. खोदलेल्या रस्त्यांमधून दुचाकीस्वारांना मार्ग काढताना गाडी कोसळून अनेक जण जखमी झालेले आहेत, मात्र या गंभीर समस्येकडे सिडकोच्या अधिकाऱ्यांना लक्ष देण्यास वेळ नव्हता.

अखेर हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर या खोदलेल्या रस्त्याचे डांबरीकरण होत असल्याने येथील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. याबाबत सिडको प्रशासनाला धन्यवादही दिले जात आहेत.

# तीन तासांच्या प्रयत्नांनंतर माथेफिरुला खाली उतरवले

अग्निशमन दलाच्या जवानांचे यश

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहत सेक्टर १७मध्ये ओम शिव इमारतीच्या एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ग्रीलवर अज्ञात माथेफिरु अडकून बसल्याची घटना शुक्रवारी (दि. १५) रात्री उशिरा घडली. तब्बल तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी या माथेफिरुला खाली उतरवले. या अज्ञात माथेफिरुची ओळख अद्याप पटलेली नाही.



कामोठे वसाहत सेक्टर १७मधील ओमशिव इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ग्रीलवर एक अज्ञात माथेफिरू चढल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्याच्या अंगावर पूर्ण कपडे नव्हते. ही व्यक्ती ग्रीलवर चढली होती. या सोसायटीमधील रहिवाशांनी या घटनेची माहिती स्थानिक कामोठे पोलीस आणि अग्निशमन दलाला दिली. ही माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले. या माथेफिरूला खाली उतरविण्यासाठी अथक प्रयत्न सुरू होते, मात्र त्याला खाली येता येत नव्हते व तो येण्याचा प्रयत्नही करत नव्हता. अनेक वेळा विनंती आणि त्याच्याशी संवाद साधून खाली उतरण्याचा प्रयत्नदेखील केला, मात्र हा माथेफिरु खाली येण्यास तयार नव्हता.

अग्निशमन दलाचे जवानांनी त्याला बऱ्याच प्रयत्नानंतर खाली उतरविले. खाली उतरवत असतानादेखील पुन्हा तो वर चढण्याचा प्रयत्न करीत होता. या अज्ञात माथेफिरूच्या कृत्याने इमारतीसह कामोठे वसाहतीतील नागरिक भयभीत झाले होते. त्या माथेफिरूला उतविताना नागरिकांची तोबा गर्दी जमली होती.

# भारती विद्यापीठ आयएमएसआरतर्फे माजी विद्यार्थी मेळावा

**पनवेल : वार्ताहर**

भारती विद्यापीठाच्या इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च माजी विद्यार्थी संघटनेतर्फे माजी विद्यार्थी मेळावा यादे-२०२२ चे आयोजन करण्यात आले होते. विविध बॅच आणि कार्यक्रमांतील ७००हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावल्याने परिसर जल्लोषाने गुंजला होता.



मेळाव्याचे २०२२ चे उद्‌ाटन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अरुप गुप्ता, भारती विद्यापीठ नवी मुंबई संकुलाचे प्रादेशिक संचालक डॉ. विलासराव कदम, नॅशनल स्टॉक एक्सचेंज वरिष्ठ उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, एप्सिलॉन आय केअर व्यवस्थापकीय संचालक श्याम आनंद, कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स माजी सहाय्यक संचालक पी. रामास्वामी, एशिया पॅसिफिक, इथथ ग्लोबल प्रमुख अमित टिपणीस आणि इतर माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले.

बीव्हीआयएमएसआर संचालक डॉ. अंजली काळसे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले, तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक विकासाबद्दल समाधान व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींनी एचआर मीट, जीडीपीआय सत्रे, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम आणि पायाभूत सुविधा विकास यांसारख्या कार्यक्रमांसाठी त्यांचे समर्थन करण्याचे वचन दिले आहे. निखिल वर्मा, मिथिलेश राऊल आणि भावना शर्मा यांना सर्वोत्कृष्ट आउटगोइंग स्टुडंट्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रा. कुलदीप भालेराव यांना बीव्हीआयएमएसआर आणि माजी विद्यार्थी संघटनेने माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट जगासोबतचे नातेसंबंध विकसित आणि राखण्यासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. अरुप गुप्ता, विजय चव्हाण, शिरीष बोकडे, माजी विद्यार्थी संघटनेच्या इतर सदस्यांनी यादे २०२२ यशस्वी करण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.



# दररोजच्या जेवणातून लिंबू झाले गायब!



## घाऊक बाजारात १५० ते १७० रुपये प्रतिकिलो दर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सलग तिसरा आठवडा लिंबाच्या दरात वाढ सुरू असून प्रतिकिलो ४० ते ६० रुपये असलेला दर शुक्रवारी १५० ते १७० रुपयांपर्यंत गेला आहे. घाऊक बाजारातच दर वाढल्याने किरकोळ बाजारात लिंबू प्रतिनग दहा ते पंधरा रुपयांपर्यंत गेले आहे. त्यामुळे बहुतांश विक्रेते आता लिंबू घेत नसून दररोजच्या जेवणातून लिंबू गायब झाल्याचे चित्र आहे. त्यात कडक उन्हाळा सुरू असल्याने लिंबाला मोठी मागणी आहे, मात्र बाजारात मागणीच्या तुलनेत आवक होत नसल्याने दर वाढले आहेत. मागील आठवड्याच्या तुलनेत ५०० क्विंटल आवक घटली आहे.

प्रतिनग दहा रुपये लिंबू मिळत आहे. एवढे महाग लिंबू कोण घेणार नाही, म्हणून आम्ही आता लिंबू विक्रीसाठीच आणत नाही, असे किरकोळ विक्रेत्यांनी सांगितले. मार्च महिन्यामध्ये घाऊक बाजारात लिंबू प्रतिकिलो ४० ते ६० रुपये इतके दर होते. त्यानंतर त्यात वाढ होत ६० ते १०० रुपये झाली. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला उन्हाचा कडका वाढल्याने लिंबाला मागणी वाढल्याने दर आणखी वाढत प्रतिकिलो १२० ते १५० रुपयांपर्यंत गेले.

आता यात आणखी वाढ होत १५० ते १७० रुपये प्रतिकिलो, तर प्रति क्विंटल सात हजार ते १० हजार रुपये बाजारभाव आहेत. ही दरवाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे उत्पादन कमी झाल्याने बाजारात मागणीच्या तुलनेत पुरवठा होत नाही. मागील आठवड्यात लिंबाच्या सहा ते सात गाड्या म्हणजेच ६०० क्विंटलहून अधिक आवक होत होती. शुक्रवारी (दि. १५) बाजारात तीन ते चार गाड्यांतून अवघे १५० क्विंटल आवक झाली आहे.

**एपीएमसी भाजीबाजारात लिंबाचे दर गेली महिनाभर सातत्याने वाढत आहेत. घाऊक बाजारात प्रतिनग लिंबू दहा रुपयांपर्यंत मिळत आहे. किरकोळ बाजारत ते आणखी महाग विकले जात असल्याने आता ग्राहकच लिंबू मागण्यास कचरत आहेत. त्यामुळे आम्हीही लिंबू खरेदी करीत नाही.**
**-रवी शर्मा, किरकोळ विक्रेता, कोपरखरणे**

### ■ अवकाळी पावसाचा फटका

***या वर्षी अवकाळी पावसाने लिंबूच्या बागांना अपेक्षित पालवी फुटली नाही. परिणामी उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यातच उन्हाच्या तडाख्यामुळे लिंबांना मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली असल्याने दरवाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.***

# गुरुवर्य पं. चिगरे स्मृती संगीत समारोह उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रसिद्ध शास्त्रीय गायक व तबलावादक स्व. पं. शांताराम चिगरे स्मृती संगीत समारोह खांदा कॉलनीतील जनसेवा हॉल येथे पार पडला. स्वरनादब्रह्म शैक्षणिक व सांस्कृतिक कला मंडळाद्वारे संचालित सुरताल संगीत विद्यालयाच्या वतीने हा समारोह झाला.

या कार्यक्रमाला अ. भा. गंधर्व विद्यालयाचे सचीव बालासाहेब सूर्यवंशी, सदस्य जमनीकांत मिश्र, रजिस्टार पं. विश्वास जाधव, मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत पांचाळ, गायिका सुरश्री श्रीखंडे आदी उपस्थित होते.

या वेळी सुरताल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रीय गायन, सुगम संगीत, भजन, भक्तीगीते, लोकगीते तसेच तबला वादन आदी कलाप्रकारांचे उत्कृष्ठ सादरीकरण करून उपस्थित रसिकांची प्रशंसा प्राप्त केली. विद्यालयाच्या शिक्षिका ज्योती पांचाळ यांनी संवादिनी व तबलागुरू विष्णू पांचाळ यांनी तबलासाथ केली.

निळकंठ भुरे यांनी बहारदार सूत्रसंचलन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. मनोज खाकाळ, अखिलेश कुंभार, वैशाली नागोठणेकर, प्राजक्ता जाधव यांनी समारोह यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.





# गणेश म्हात्रे यांना आदरांजली

**पनवेल :** पदवीधर शिक्षक तथा गायक संगीतकार, भजनसम्राट गणेश नारायण म्हात्रे यांना आदरांजली वाहण्यासाठी राजिप शाळा विचुंबे येथे ग्रामस्थ मंडळ, माजी विद्यार्थी, शिक्षकवृंदाने शोकसभेचे आयोजन केले होते. विचुंबेचे माजी सरपंच गणपत म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शोकसभेत ग्रामस्थ मंडळ विचुंबे, बांठिया हायस्कूलचे पर्यवेक्षक महाजन, माजी विद्यार्थी व शिक्षकवृंदाने श्रद्धांजली वाहिली.

# रत्नवेध संस्थेतर्फे बालनाट्य शिबिर

**उरण** : नाट्य प्रशिक्षणातून बाळगोपाळांचे व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी ज्येष्ठ दिग्दर्शक विनायक सावर्डेकर आणि इतर मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली उरण मध्ये लहान मुलांसाठी प्रथमच रत्नवेध संस्थेतर्फे ८ ते २२ मे दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत बालनाट्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात वाचन, भाव, भाषा, उच्चार, अभिनयाची ओळख, रंगमंचावरील वावर, वापर व्यक्तिमत्व विकास याबाबत मार्गदर्शन देण्यात येणार आहे. प्रत्येक शिबिरार्थींना संस्थेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी आनंद ठक्कर (८८७९०४५००७), सुषमा काळे (८२९१४४६२०३), यांना संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील एसटी स्थानके पुन्हा गजबजली

## ▪ रायगडातील ५० टक्के कर्मचारी कामावर हजर ▪ उत्पन्नात हळूहळू होतेय वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

एस. टी. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे एसटी स्थानकांमध्ये गेले ४ महिने शुकशुकाट होता. आता ही स्थानके पुन्हा गजबजू लागली आहेत. न्यायालयीन प्रक्रियेनंतर कर्मचारी हळूहळू रूजू होवू लागले असून ही संख्या ५० टक्क्यांवर पोहचली आहे. त्यामुळे संपाच्या खाईत लोटलेल्या एसटीच्या उत्पन्नातही हळूहळू वाढ होत आहे.

आपल्या विविध मागण्यांसाठी दिवाळीपासून एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. सुरूवातीला काही दिवसात हे आंदोलन शमेल असे वाटत असतानाच आंदोलनाने उग्ररूप धारण केले. सरकारने अनेक आश्वासने दिली, बैठका झाल्या परीवहन मंत्री अनिल परब यांनी पगारवाढीची घोषणा केली. परंतु कर्मचारी आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम राहिले. तब्बल चार महिन्यांहून अधिक काळ चाललेल्या या संपाचा ग्रामीण



जनजीवनावर मोठा परीणाम झाल्याचे पहायला मिळाले.

एसटी म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी, तीच ठप्प झाल्याने नागरीकांचे मोठे हाल सुरू झाले. आधीच एसटीचा संप त्यातच पेट्रोल आणि डिझेलचे दर भरमसाठी वाढल्याने खासगी प्रवासी वाहतूकीचे दरही वाढले. एसटी कर्मचाऱ्यांचा हा संप ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मोडणारा ठरला. तरीही कर्मचारी महामंडळाचे शासनात विलीनीकरण करावे या भूमिकेवर ठाम राहिले. सरकारने नोटीसा, निलंबन, सेवेतून कमी करणे अशाप्रकारच्या कारवाई केल्या, तरीही कर्मचारी मागे हटले नाहीत.

बऱ्याच मोठ्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर आता हळूहळू कर्मचारी कामावर हजर व्हायला सुरूवात झाली आहे. २२ एप्रिलपर्यंत कर्मचाऱ्यांनी हजर व्हावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कामावर हजर होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या दररोज वाढते आहे. रायगड विभागात महाड, माणगाव, श्रीवर्धन, पेण, कर्जत, अलिबाग, रोहा, मुरूड या आठ आगारांमध्ये कर्मचारी हजर व्हायला सुरूवात झाली आहे. संपानंतर आतापर्यंत १,१०० कर्मचारी हजर झाले आहेत. त्यात २९९ चालक आणि २०७ वाहकांचा समावेश आहे. एसटीच्या फेऱ्यादेखील वाढल्या असून उत्पन्नातदेखील वाढ झाली आहे, असे असले तरी एसटीला दररोज २० लाखांचा फटका रायगड विभागात सहन करावा लागत आहे.

सध्या शाळांना सुट्टी पडल्याने अनेकजण आपापल्या गावी निघाले आहेत. अशा परीस्थितीत सर्वात कमी खर्चात प्रवासाचा पर्याय एसटी हाच आहे. त्यामुळे एसटी स्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढलेली पहायला मिळते आहे. निमशहरी भागात असलेल्या स्थानकांमध्ये चांगली प्रवासी संख्या पहायला मिळते. लांब पल्ल्यांच्या फेऱ्या फारशा नसल्या तरी मुंबई पुण्याकडे जाणाऱ्या बहुतांश फेऱ्या रायगडमधून सुरू झाल्याचे आशादायी चित्र पहायला मिळते आहे.

**जिल्ह्यातील एसटीची सद्यस्थिती**

आतापर्यंत हजर कर्मचारी – १,१००
त्यातील चालकांची संख्या – २९९
वाहकांची संख्या – २०७
धावणारया बसेस – १७५
दिवसाचे रनिंग – ५० हजार किलोमीटर
सध्याचे उत्पन्न – १६ लाख रूपये
दररोजचा फटका – २० लाख रूपये
सेवेतून बडतर्फ कर्मचारी – ४५८
निलंबित कर्मचारी – ५७४
नोटीसा बजावलेले कर्मचारी – ६००

**आतापर्यंत ५० टक्के कर्मचारी हजर झाले आहेत. उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून प्रवाशांना जास्तीत जास्त सेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. उर्वरीत कर्मचारी हळूहळू सेवेत रूजू होत आहेत. ज्या कर्मचाऱ्यांवर बडतर्फी किंवा निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, त्यांना एसटीकडे अपील करण्याची संधी न्यायालयाने दिली आहे. त्यामुळे आगामी काळात एसटीची सेवा पूर्ववत होईल, अशी आशा आहे.**

**–अनघा बारटक्के,**
**विभाग नियंत्रक, रायगड**

# जिल्ह्यात पर्यटकांचा ओघ; व्यावसायिकांमध्ये उत्साह

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शालेय परीक्षा संपल्याने तसेच सलग सुट्टया आल्याने कोकण किनारपट्टीवर हौशी पर्यटकांनी गर्दी केली. रायगड जिल्ह्यातील नागाव, काशीद, नांदगाव, मुरुड, दिवेआगर, हरिहरेश्वर सारख्या पर्यटन स्थळांवरील पर्यटकांचा ओघ वाढल्याने हॉटेल, लॉजिंग व्यावसायिकांचा उत्साह वाढला आहे.

मुरुड तालुक्यातील काशीद बीच, सर्वे, चिकणी, मुरुड, आगरदांडा, ऐतिहासिक जंजिरा तसेच दिवे आगारातील सागर किनारे पर्यटकांनी फुलले आहेत. जंजिरा किल्ला पाहण्यासाठीही पर्यटकांना गर्दी होत आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह पश्चिम महाराष्ट्रातील पर्यटक मोठ्या



संख्येने दाखल झाल्याने स्थानिक व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे.

राजपुरी व खोरा बंदरातून जंजिऱ्यात जाण्यासाठी प्रवाशी वाहतूक सोसायटीतर्फे १३ शिडाच्या होड्या व लाँच राजपुरी येथे तैनात करण्यात आली आहे. एका होडीतून ३० प्रवाशांची वाहतूक केली जात असल्याचे जंजिरा जल प्रवासी वाहतूक संस्थेकडून सांगण्यात आले. राजपुरी बंदरावर वाहनतळाची व्यवस्था असल्याने खोरा बंदरापेक्षा याठिकाणी पर्यटक अधिक येतात. गेल्या चार दिवसांत आगरदांडा येथील जंगल जेट्टीवर वाहनांची गर्दी वाढल्याने काही पर्यटकांनी मांदाड पुलावरून हरेश्वर व दिवेआगर इथे जाणे पसंत केले. मुरुड समुद्र किनारी विविध स्टॉल्स, वाहनांची वर्दळ विशेष असून साहसी खेळांचाही पर्यटकांनी मनसोक्त आनंद लुटला.

**सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची संख्या वाढते. त्यामुळे किनाऱ्यावरील सुरक्षा वाढविण्यात यावी. समुद्रात किती अंतरापर्यंत पोहायचे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी किंवा निगराणीसाठी सुरक्षा पथक तैनात असावे.**

**–प्रथमेश सावंत, पर्यटक**

## चौल येथे एकपात्री अभिनय स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मे महिन्यातील सुट्टीतील पहिल्याच दिवशी अभिनय प्रेमींसाठी सुवर्ण संधी उपलब्ध करून देताना चौल–भाटगल्ली मधील मोरया कला ॲकदमीच्या वतीने दि.१ मे रोजी एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले आहे.

अनेक प्रसिध्द नाटच कलाकारांसह विविध नाट्यामध्ये काम करणारे, प्रसिध्द नाट्य कलाकार अभिनेते म्हणून मुंबईत प्रसिध्दीस मिळवलेले प्रकाश कवळे यांच्या संकल्पनेतून सर्वासाठी खुला व स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन एकपात्री अभिनय स्पर्धेचे माध्यमातून चौल भाटगल्ली येथील मोरया कला ॲकडमीत केले आहे. या स्पर्धेचा शुभारंभ रविवार दि. १ मे रोजी दुपारी चार वाजता होईल. स्पर्धा दोन गटात घेतली जाणार असून प्रथम गट ६ वर्ष ते १४ वर्ष वयोगटाचा असेल, तर व्दितीय गट १५ वर्षावरील सर्व वयोगटासाठी असेल. प्रथम गटासाठी तीन ते सहा मिनिटे व व्दितीय गटासाठी पाच ते सात मिनिटे वेळ अभिनय स्पर्धे साठी देण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रकाश कवळे–९९६९००९७२१, व सुधाकर मेस्त्री–९७०२५४५०१२ यांच्याकडे संपर्क करावा. स्पर्धेतील दोन गटातील तीन विजेत्यांना रोख रक्कम व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येईल, असे आयोजकांनी कळविले आहे.

# भातसई येथे श्री महादेवी मातेच्या यात्रेनिमित्त भक्तांचा मेळा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा भातसईत हजारो नयनांनी भातटोचणीचा कार्यक्रम टिपला. भातसई येथे भरला श्री महादेवी मातेच्या यात्रेनिमित्त भक्तांचा मेळा भरला होता.

यात्रेनिमित्त संपुर्ण भाविकांचे लक्ष सजवलेल्या स्टेजकडे लागले होते. आतुरतेने गळटोचणी या कार्यक्रमाची भाविक वाट बघत होते. अखेर तो क्षण यात्रेदिवशी सायंकाळी आला. ठिक ५.४५ वाजता मुख्य गळ टोचून घेणाऱ्या हनुमंत कानु दाभाडे भाविकाला स्टेज जवळ आणण्यात आले. यांच्याबरोबर नवस केलेल्या कृष्णा पांडुरंग रटाटे, मारुती पांडुरंग चवरेकर, संतोष रघुनाथ खरीवले, भगवान कृष्णा शेळके, शैलेश नारायण चोरगे हे ही गळ टोचून भाविक पाठोपाठ आले. पारंपरीक खालु बाजाचा आवाज घूमत होता. ६ च्या सुमारास मुख्य गळ टोचून घेणारे हनुमंत कानु दाभाडे भाविकाला लाटेला अधांतरी बांधण्यात आले. सगळयांच्या नजरा लाटेकडे होते. हर हर महादेवाचा गजर होताच लाट फिरविण्यात आली. हे दृश्य हजारो नयनांनी भक्ती भावाने टिपले होते. पंचक्रोशी, जिल्ह्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या प्रमाणात मातेच्या दर्शनासाठी आली होती. श्री महादेवी मातेची पालखी ५.२० च्या सुमारास मंदिरात आणण्यात आले. यात्रेनिमित्ताने श्री महादेवी मातेचे मंदिर परीसर दुपारपासून गजबजून गेले होते. विविध खेळणी, मिठाइची दुकाने यासह अन्य दुकाने थाटली होती. दुपारी २ नंतर या पंचक्रोशीतील मानाच्या महादेवाच्या काठ्या पारंपरीक वाद्य वृंदावर वाजत गाजत मंदिराकडे आल्या होत्या.

### कोरोनानंतर उत्साह

**कोरोना महामारीनंतर उत्सव होत असल्याने ग्रामस्थ व भाविकांमध्ये उत्साह संचारला होता. आदल्या दिवशी भातसई येथून पालखी सोहळ्यास सुरुवात झाली. पारंपरीक वाद्यवृंदावर भजनी मंडळाच्या सहभागाने पालखी सोहळा झाला. या परीसरातील भातसई, आदी गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. संपुर्ण गावात रंगरंगोटी,सडा रांगोळी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भातसई, लक्ष्मीनगर, झोळांबे कोपरेसह मेढा परीसर यात्रा उत्सवासाठी सजला होता.**

# इंटरनॅशनल एरोनॉटिकल डिझाईन चॅलेंज स्पर्धेत रतिश पाटीलचे यश

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शहापूर येथील रतिश संतान पाटील याने भूषणावह कामगिरी करून रायगड जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. या यशाने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेलाय. रायगड शहापूरचा रतिश पाटील आपल्या कर्तृत्वाने भारताचा अभिमान ठरला आहे.

रतिश पाटील हा एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिअरिंग पुणे येथे मेकॅनिकल शाखेत तिसऱ्या वर्षात पदवी घेत आहे. एरोनॉटिकल या क्षेत्रात त्याचे जास्त कसब व प्राविण्य आहे. तसेच तो टीम गुरूदक्ष या आंतरराष्ट्रीय एरोनॉटिकल टीममध्ये डिझाईन डिपार्टमेंटचे नेतृत्व करत आहे. नुकतीच (सी इंटरनॅशनल एरो डिझाईन चॅलेंज स्पर्धा २०२२) ही स्पर्धा



कॅलिफोर्निया अमेरिका येथे पार पडली. या स्पर्धेत जगातील ७० देशाच्या विद्यापीठांचा समावेश होता. त्यातील भारतातील पुणे विद्यापीठातील महाविद्यालयातून Team Garudashwa या टीमचे रतिश पाटील याने नेतृत्व करून जागतिक स्तरावर भारताला प्रथम क्रमांक मिळवून दिला. यावेळी रतिश संतान पाटील याने सांगितले की भारतासारख्या व त्यातही महाराष्ट्राच्या क्रांतिकारी मातीत जन्मात आलो तर या भारत देशाचे नावलौकीकात आपल्याला जसे जसे योगदान देता येईल ते योगदान देण्यासाठी कायम सकारात्मक भूमिकेत राहिलो. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न व मेहनत केली. आई, वडील, गुरुजन व मित्रपरिवार यांचा पाठिंबा व मार्गदर्शन मिळाले, त्यातूनच हे यश मिळाले. भविष्यात अधिकाधिक जोमाने काम करू असे रतिश पाटील म्हणाला. रतिशच्या या उत्तुंग कामगिरीचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत असून वडील संतान सुदाम पाटील व यशोदा संतान पाटील यांचे देखील विशेष कौतुक होत आहे.

# मागणी वाढूनही बाजारपेठेपासून 'हापूस' दूर

## ▪ अवकाळीचा परिणाम ▪ खवय्यांमध्ये नाराजी ▪ दर मात्र स्थिर

**पेण : रामप्रहर वृत्त**

एप्रिल,मे महिन्यात बाजारपेठेत हापूसची आवक वाढत. कोकण आणि कर्नाटकमधून आंब्यांची आवक बाजारपेठेत होते. मात्र सगळीकडे कोकणच्या हापूसला मोठी मागणी असते. सध्या हापूसची मागणी खवय्यांमध्ये वाढली आहे. मात्र त्या तुलनेत बाजारपेठेत 'हापूस' म्हणावा तसा दिसत नाही. आंबा उत्पादनावर अवकाळी पावसाचा यंदा परिणाम झाला आहे. आवक कमी असल्याने बाजारपेठेत दर मात्र स्थिर राहिले आहेत.

या वर्षी मोहोर फुटण्याच्या काळातच अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला. याचा परिणाम आंबा उत्पादनावर झाला. सध्या बाजारात आवक कमी आहे. एप्रिल व मे महिना हा 'हापूस' चा मुख्य हंगाम असतो. बागायतदार, शेतकऱ्यांना या दिवसात चांगले दिवस येतात. चार पैसे मिळून जातात. तर दुसरीकडे खवय्येही आंबा मिळतो म्हणून खूष असतात. साधारणपणे दरवर्षी या महिन्यात हापूसच्या पेट्ट्याच्या पेट्या बाजारपेठांमध्ये दाखल होतात. कर्नाटक आंब्याची आवकही या काळात वाढत असते. हापूस मिळाला नाही तर कर्नाटकचा हापूस खवय्ये खरेदी करतात. मात्र हापूसची गोडी कर्नाटकच्या आंब्याला नसते. दरम्यान एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात हापूसची आवक वाढेल अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### *अवकाळीचा परिणाम*

*अवकाळी पावसामुळे हापूस आंबा उत्पादन यंदा कमी दिसून येत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत हापूस आंबा यंदा परिसरातील बाजारपेठांमध्ये कमी दिसून येत आहे. बाजारात हापूसची आवक कमी असल्याने दर स्थिर राहिले आहेत. १५ एप्रिलनंतर आवक वाढल्यास दर कमी होवून खवय्यांना मनासारखा 'हापूस' मिळेल असे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.*

# रोह्यात अभंग सेवा मंडळातर्फे भागवत सप्ताह

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे शहर व परिसरात धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या अभंग सेवा मंडळातर्फे दि.२१ ते दि. २८ एप्रिल या कालावधीमध्ये भागवत सप्ताहाचे आयोजन भाटे सार्वजनिक वाचनालय येथे करण्यात आले आह.

या सप्ताहाच्या निमित्ताने रोज सायंकाळी ४:३० ते रात्रौ ८:३० या कालावधीत भागवत कथाकार ,राष्ट्रीय किर्तन सम्राट ह.भ.प. चारूदत्त गोविंदस्वामी आफळे बुवा यांचे श्रवणीय किर्तन व परखड विचार ऐकण्याची संधी रोहेकरांना मिळणार आहे. दि. २१ रोजी दुपारी २ वा.भागवत सप्ताहाची दिंडी निघणार आहे तसेच या निमित्ताने सात दिवसात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २८ एप्रिल रोजी ह.भ.प. मयुरेश केळकर व ह.भ.प. संज्योत केतकर हे कीर्तन सादर करणार आहेत. सदर सप्ताह ह.भ.प.वेदमूर्ती संजय केळकर रेवदंडा यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. सदर सप्ताह यशस्वी करण्यासाठी भागवत सप्ताह प्रमुख हेमंत ओक, अभंग सेवा मंडळ अध्यक्ष विवेक बापट ,दासगणू मंडळाच्या प्राची भिडे, भाटे वाचनालय अध्यक्ष किशोर तावडे आदींसह या संस्थांचे सर्व कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत.

रोहेकर नागरिकांनी या भागवत सप्ताहाचे औचित्य साधून सातही दिवस आयोजित केलेल्या उपक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन श्री भागवत सप्ताह प्रमुख हेमंत ओक यांनी केले आहे.

# खारापटीत हनुमान जयंती उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खारापटी गावात हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी ग्रामस्थांनी ग्रामदैवत श्री हनुमानाची पालखी काढली होती. ग्रामस्थांसह भाविकांनी हनुमंताचे दर्शन घेतले.

खारापटी गावात गावाचे ग्रामदैवत श्री हनुमानाच्या मंदिरात हनुमान जयंती निमित्ताने सकाळपासूनच भाविकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. संपुर्ण गाव हनुमान जयंती निमित्ताने सजले होते. नागरीकांनी घरासमोर सडा रांगोळी काढली होती. गृहिणींनी आपल्या घरासमोरील परीसर सजवले होते.नागरीकांनी आपल्या घरासमोर विद्युत रोषणाई केली होती. कामानिमित्ताने बाहेर असलेल्या मुंबईकर यासह अन्य गावी असलेले लोकांनी आपल्या ग्रामदेवताच्या



पालखी उत्सवाला आपल्या गावी हजेरी लावली होती. संपुर्ण गाव हनुमान जयंती निमित्ताने उत्सवमय झाले होते.

सायंकाळी ग्रामस्थांनी श्री हनुमंताची भव्य पालखी मिरवणूक काढली. खारापटी हनुमान मंदिर ते वेताळ महाराज मंदिर जुना खारापटी गाव ते पुन्हा पडम नाका करिता संपुर्ण खारापटी गावात आळीतून पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पालखीचे स्वागत महिलांसह ग्रामस्थांनी केले. अबालवृध्द पासून सर्वांनी पालखीचे दर्शन घेतले. यावेळी सर्वांनी पालखी मिरवणुकीत सहभागी होत पारंपरीक नृत्य केले. संपुर्ण खारापटी गाव उत्सवमय दिसून येत होते.

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | राजस्थान वि. कोलकाता सायं. ७.३० वा., मुंबई

# बंगळुरुचा दिल्लीवर विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये शनिवारी झालेल्या दुसऱ्या साखळी सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सला धूळ चारत १६ धावांनी विजय नोंदवला. या विजयासाठी दिनेश कार्तिक आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी फलंदाजीत मोठी मेहनत घेतली, तर जोश हेझलहूड तीन विकेट घेत बंगळुरूला विजयापर्यंत घेऊन गेला. बंगळुरूने दिलेल्या १९० धावांचा पाठलाग करताना दिल्लीचा संघ १७३ धावाच करू शकला.

बंगळुरूने दिलेल्या १९० धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी आलेल्या दिल्लीची सुरुवात चांगली झाली. दिल्लीचा पहिला गडी संघाच्या ५० धावा झालेल्या असताना बाद झाला. सलामीला आलेल्या पृथ्वी शॉने १६ धावा केल्या, तर डेव्हिड वॉर्नरने बंगळुरूच्या गोलंदाजांची धुलाई करीत ३८ चेंडूंमध्ये पाच षटकार आणि चार चौकार लागावत ६६ धावा केल्या. वॉर्नरनतंर मात्र दिल्लीचा एकही फलंदाज चांगली खेळी करू शकला नाही.

मिशेल मार्शने १४ धावा केल्या. ऋषभ पंत ३४ धावा करुन झेलबाद झाला. मधल्या फळीतील रोवमन पॉवेल (०), ललित यादव (१), शार्दुल ठाकुर (१७) यांनी निराशा केली. अक्षर पटेल आणि कुलदीप यादव नाबाद राहिले. २० षटके संपेपर्यंत त्यांनी प्रत्येकी दहा धावा केल्या. शेवटी दिल्लीला १७३ धावांपर्यंत मजल मारता आल्यामुळे बंगळुरूचा १६ धावांनी विजय झाला.



तत्पूर्वी नाणेफेक जिंकून दिल्ली कॅपिटल्सने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी आलेल्या सलामीवीर फाफ डू प्लेसीस आणि अनुज रावत या जोडीने निराशा केली. प्लेलीस अवघ्या आठ धावा करूनबाद झाला, तर अनुज खातेदेखील खोलू शकला नाही.

**कार्तिक अन् मॅक्सवेलची फटकेबाजी**

त्यानंतर विराट कोहली १२ धावा करून बाद झाला.

विराट बाद झाल्यावर बंगळुरुच्या ५० धावा आणि तीन गडी बाद अशी स्थिती झाली. त्यानंतर आलेल्या मॅक्सवेलने अर्धशतकी खेळी करीत बंगळुरूची बाजू मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्याने ३४ चेंडूंमध्ये सात चौकार आणि दोन षटकार लगावत ५५ धावा केल्या. मॅक्सवेल बाद झाल्यानंतर प्रभुदेसाई अवघ्या सहा धावा करूनबाद झाला.

शेवटी शाहबाज अहमद आणि दिनेश कार्तिक या जोडीने बहारदार फलंदाजी करीत दिल्लीच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. शाहबाजने २१ चेंडूंमध्ये नाबाद ३२ धावा केल्या, तर कार्तिकने ३४ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि पाच षटकार लगावत नाबाद ६६ धावा केल्या. प्रभुदेसाई बाद झाल्यानंतर बंगळुरू संघ १५० धावा करू शकेल का अशी शंका असताना कार्तिक आणि शाहबाज जोडीने धडाकेबाज फलंदाजी करीत बंगळुरूला १८९ धावांपर्यंत नेऊन ठेवले.

# महाडमध्ये अर्ध मॅरेथॉन, क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण

**महाड : प्रतिनिधी**

वेदा जनजागृती मंचच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने एक धाव शहीदांसाठी ही हाफ मॅरेथॉन आणि राजमाता महिला क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धांचे बक्षीस वितरण नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात झालेल्या बक्षीस वितरण समारंभास पद्मश्री पुरस्काराने सन्मानित महाडचे प्रसिद्ध डॉ. हिम्मतराव बावस्कर तथा नारायण देशमुख, रायगडभूषण सुरेश महाडिक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजय सावंत, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, 'बार्टी'चे जमदाडे, प्रा. विश्वास पाटील, राजू देशमुख, संस्थापक अध्यक्ष डॉ. दिगंबर गीते आदी उपस्थित होते.



अर्ध मॅरेथॉनमध्ये पुरुषांच्या पाच किलोमीटर गटात प्रथम क्रमांक ऋतुराज राजेश घाणेकर, द्वितीय शिवम राजेश राजिवडे, तृतीय वैभव विनोद बने, तीन किलोमीटर गटात प्रथम क्रमांक सुरज प्रभाकर शिगवण, व्दितीय तुषार अनिल वेचावडे, तृतीय शंतनू निवृत्ती भुवड, महिलांमध्ये तीन किलोमीटर गटात प्रथम क्रमांक निता राजूदास पवार, व्दितीय गायत्री सुधीर बोरगावकर, तृतीय संगीता बाळासाहेब बारगजे, चौथा मनीषा आकाश पवनालकर, किशोरी तीन किमी गटात प्रथम क्रमांक अमृता राजेंद्र दरेकर, द्वितीय सपना सुनील माने, तृतीय सलोनी गोविंद किर्जत, तसेच चंद्रकांत पांडुरंग साळावकर, निलेश केशव कावळे, महेश शिंदे, मंगेश नगरकर, नाना झंझाड, आराध्य अंबोणकर यांचा उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# आयपीएलपाठोपाठ फुटबॉल सामन्यांसाठी नवी मुंबईची निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या यजमानपदाखाली ११ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या कुमारी (१७ वर्षांखालील) विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील सामन्यांसाठी नवी मुंबईसह भुवनेश्वर आणि गोवा या तीन शहरांची निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेची कार्यक्रमपत्रिका झुरिच येथे २४ जूनला जाहीर करण्यात येणार आहे.

**कुमारी विश्वचषक स्पर्धा रंगणार**

कोरोनाच्या साथीमुळे २०२०मध्ये स्पर्धा रद्द करण्यात आल्यानंतर फिफा, अखिल भारतीय फुटबॉल महासंघ आणि स्थानिक संयोजन समितीने सामन्यांच्या शहरांची नावे निश्चित केली आहेत.

'खेळाडू आणि अन्य सदस्यांच्या सुरक्षेची काळजी घेत भुवनेश्वर येथील किलगा स्टेडियम, गोवा येथील पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम आणि नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम येथे सामने रंगतील,' असे स्थानिक संयोजन समितीने म्हटले आहे. सध्या आयपीएल सुरू असून यातील काही सामने डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर खेळले जात आहे.

भारतासह ब्राझील, चिली, चीन, कोलंबिया, जपान आणि न्यूझीलंड या सहा देशांनी स्पर्धेतील सहभाग निश्चित केला आहे. एकूण १६ देशांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेची पात्रता स्पर्धा सुरू आहे.

# रोशन खडे ठरला 'खोपोली श्री'चा मानकरी

**खापोली : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दीपक ब्रदर्स संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विकी गायकवाड आणि पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून रायगड बॉडी बिल्डर्स अ‍ॅण्ड फिटनेस असोसिएशन आणि खोपोली शहर बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या मान्यतेने या वर्षीही खोपोली श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि. १६) करण्यात आले होते. स्पर्धेत चार वेगवेगळ्या गटांत ६९ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अंतिम फेरीत मुंबई पोलीस दलातील रोशन खडे खोपोली श्री किताबाचा मानकरी ठरला.



खोपोली शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील पटांगणात खोपोली श्री शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस निरिक्षक शिरीष पवार यांच्या हस्ते डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. या वेळी माजी ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, किशोर पानसरे, माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत पुरी, अंकीत साखरे, शेखर पिंगळे, भूषण पाटील, छत्रपती पुरस्कार विजेते मारूती आडकर, आयोजक विकी गायकवाड, अमित पवार आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील ५० ते ५५, ५५ ते ६०, ६० ते ६५, ६५ ते ७० आणि ७० किलो वजनी खुला गटामध्ये मिळून ६९ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अंतिम फेरीत मुंबई पोलीस रोशन खडे याने खोपोली श्री किताबाचा बहुमान पटाविला. त्याला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले, तर बेस्ट पोझर सलमान नालबन, बेस्ट बॉडी इम्प्रूव्हमेंट इजाज शेख या विजयी स्पर्धकांनाही बक्षीस देण्यात आले.

पारितोषिक वितरण माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, नगरसेवक मनेष यादव, सामाजिक कार्यकर्ते रवी रोकडे, विनायक तेलवणे, विशाल गायकवाड, भास्कर लांडगे, राजू गायकवाड, अनिल गायकवाड, प्रशांत मांगुळकर यांच्या उपस्थितीत झाले.

# कबड्डी स्पर्धेत कुर्डूस संघ विजेता

**नागोठणे : प्रतिनिधी**

जय हनुमान क्रीडा मंडळ मजरे जांभूळपाडा-पाली आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा नुकती झाली. या स्पर्धेत मातृछाया कुर्डूस संघाने विजेतेपद पटकाविले.

द्वितीय क्रमांक धावीर स्पोर्ट्स रोहा, तृतीय आई गावदेवी पाटणसई संघाने, तर चतुर्थ क्रमांक सिद्धिविनायक शहापूर संघाने मिळविला. सर्व विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू सुमित शिर्के (रोहा), उत्कृष्ट चढाईपटू गौरव पाटील (कुर्डूस), उत्कृष्ट पकडपटू अमर भोईर (शहापूर) आणि पब्लिक हिरो केतन नायक (पाटणसई) ठरले. त्यांनाही पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# प्रशिक्षक खिलारी द. कोरियाला रवाना



**मुंबई** : दक्षिण कोरियात २१ ते २४ एप्रिलदरम्यान होणाऱ्या विश्व तायक्वाँदो पुमासे प्रतियोगितेत ६० वर्षाखालील पुरुष एकेरी सादरीकरण गटात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सावरकर तायक्वाँदो अकॅडमीचे प्रशिक्षक राजेश खिलारी यांची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी ३५ खेळाडू आणि पाच अधिकारी अशा भारतीय संघाने रविवारी रात्री द. कोरियाकडे प्रस्थान केले.

या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर यांनी खिलारी आणि भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या.


वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...

पनवेल तालुका सोशल मीडिया सेलचे अध्यक्ष

राजेश पाटील

(अध्यक्ष, सुकापूर गाव कमिटी भाजपा)

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

सौजन्य : अमित जाधव (राजिप, सदस्य)
भूपेंद्र पाटील (पं.स. सदस्य)

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...

पनवेल शहर भाजपाचे सरचिटणीस

अमरीश मोकल

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा

सौजन्य : रमेश देशमुख

वर्ष १७ वे

भाव धरूनियां वाचे ज्ञानेश्वरी ।
कृपा करी हरी तयावरी ।।

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली ।। जेणे निगमवल्ली प्रगट केली ।।

विठ्ठल रूख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी ।।

सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।

तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम ।।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत

वै ह. भ. प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह. भ. प. बानुबाई (कोपर) यांच्या उपस्थितीत.

अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

* ठिकाण :- श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु. ह. भ. प. वै. सदानंद गुरूजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह. भ. प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १४/०४/२०२२ ते चैत्र कृ.५, गुरुवार दि. २१/०४/२०२२ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

माजी खासदार श्री. रामशेठ ठाकूर साहेब व सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर

* दैनंदिन कार्यक्रम *

पहाटे ०४.०० ते ०६.०० वा - काकडा
सकाळी ०८.३० ते १२.३० वा - ज्ञानेश्वरी पारायण
व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी)
सायं ०४.०० ते ०५.०० वा - प्रवचन
सायं ०६.०० ते ०७.०० वा - सामुदायीक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा - किर्तन
किर्तनसाथ : उरण-पनवेल वारकरी सांप्रदाय मंडळ

| वार / दिनांक | प्रवचन (सायंकाळी ०४.०० ते ०५.००) | किर्तन (रात्री ०८.०० ते १०.००) |
|---|---|---|
| सोमवार, दि. १८/०४/२०२२ | ह. भ. प. राजेंद्र महाराज (गुरुजी) (कुंडेगांव) | ह.भ.प. गणेश महाराज पुलकुंटवार (भिवंडी) कै. विठ्ठल महादेव देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य -श्री. उत्तम विठ्ठल देशमुख (गव्हाण) |
| मंगळवार, दि. १९/०४/२०२२ | ह. भ. प. बळीराम महाराज (वाघिवली) | ह.भ.प. दादा महाराज वायसळ (रामकृष्ण भक्ती धाम आश्रम- गंगापूर, संभाजीनगर) सौजन्य -सौ. श्रद्धा रमेश ठाकूर (खारकोपर) |
| बुधवार, दि. २०/०४/२०२२ | सकाळी ८ वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन<br>सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. प्रविण महाराज पवार (औरंगाबाद) |

काल्याचे किर्तन गुरुवार दि. २१/०४/२०२२ रोजी सकाळी १० ते १२ वा - ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री (शुक्लेश्वर संस्थान-बीड)

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...

भाजपा कार्यकर्ते

प्रितेश मुकादम

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा

सौजन्य : अमित पाटील


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com